मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in | E mail - dainikyuvakaadhar@gmail.com | facebook : yuvakadhar

दैनिक युवक आधार मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १०७ ■ गुरुवार, २५ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# महापालिका निवडणुकांसाठी ठाकरे बंधूंची युती

## राज-उद्धव दोघांकडूनही अधिकृत घोषणा; कोणत्या जिल्ह्यांत एकत्र लढणार?

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे या दोन्ही बंधूंच्या युतीची घोषणा बुधवारी (दि. २४) दुपारी १२ वाजता होणार, अशी माहिती शिवसेना ठाकरे गटाचे खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी मंगळवारी (दि.२३) सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली. त्यानुसार, आज वरळी येथील हॉटेल ब्लू सी याठिकाणी ठाकरे बंधूंनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. युतीच्या घोषणेआधी ठाकरे बंधूंनी शिवाजी पार्क येथील बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळावर जाऊन बाळासाहेबांना अभिवादन केले. यावेळी राज ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्यासह रश्मी ठाकरे, शर्मिला ठाकरे, आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांचीही उपस्थिती होती.

**महाराष्ट्राला फक्त ठाकरेच नेतृत्व देऊ शकतात**

पत्रकार परिषदेच्या सुरुवातीला शिवसेना उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत म्हणाले, "आजचा दिवस महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आहे. मराठी मंगलकलशची आठवण आज येत आहे. हा आनंदाचा क्षण महाराष्ट्राला अनुभवायला मिळत आहे. महाराष्ट्राला फक्त ठाकरेच नेतृत्व देऊ शकतात हे सांगणारी ही पत्रकार परिषद आहे."

संयुक्त पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे म्हणाले, "संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याची आठवण संजय राऊत यांनी करून दिली. अनेकांनी बलिदान देऊन मुंबई महाराष्ट्राला मिळवून दिली. संयुक्त महाराष्ट्राच्या लढाईत असलेले आमचे



दोघांचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे, माझे वडील बाळासाहेब ठाकरे आणि राज ठाकरे यांचे वडील श्रीकांत ठाकरे यांनी मुंबईसाठी बलिदान दिले."

**एकत्र आलो आहोत...**

पुढे ते म्हणाले, "मुंबईचे लचके तोडण्याचे मनसुबे दिल्लीत आखले जात आहेत. आज आम्ही आमचं कर्तव्य म्हणून एकत्र आलो आहोत. मी याआधीही म्हणालो आहे, एकत्र आलो आहोत एकत्र राहण्यासाठी."

**चुकाल तर संपाल...**

"तुटू नका फुटू नका, मराठीचा वसा टाकू नका. मला खात्री आहे मराठी माणूस कोणाच्या वाटेला जात नाही पण त्याच्या वाटेला कोणी गेलं तर जाऊ देत नाही. मुंबईला महाराष्ट्रापासून कोणी वेगळं करण्याचा प्रयत्न करेल तर त्याचा खात्मा केल्याशिवाय राहणार नाही. भाजपने अपप्रचार केला होता 'बटेंगे तो कटेंगे' तसं मी आता सांगतोय, चुकाल तर संपाल." असा सूचक इशाराही यावेळी उद्धव ठाकरे यांनी दिला.

**मुंबईचा महापौर मराठीच होणार**

यावेळी राज ठाकरे म्हणाले, "निवडणूका लढवणाऱ्यांना संधी दिली जाईल. मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि तो आमचाच होणार. कुठल्याही वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. तिथून आम्ही एकत्र येण्याची सुरुवात झाली. कोण किती जागा लढवणार, आकडा काय ते नाही सांगणार. महाराष्ट्रात लहान मुले पळवण्याच्या टोळ्या सक्रिय आहेत."

**शिवसेना आणि मनसेची युती झाली**

"अनेक दिवसांपासून सर्वांना प्रश्न होता, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार का? त्यांची युती होणार का? तर आज मी महाराष्ट्राच्या जनतेला सांगतो, शिवसेना आणि मनसेची युती झाली, हे जाहीर करतो", असे म्हणत राज ठाकरे यांनी युतीची अधिकृत घोषणा केली.

**कोणत्या जिल्ह्यांत एकत्र लढणार?**

ठाकरे बंधूंची ही युती मुंबईसह नाशिक, कल्याण-डोंबिवली, पुणे, ठाणे आणि मीरा-भाईंदर महापालिकांसाठी असणार आहे. अशी माहिती यापूर्वीच संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना दिली होती. आता युतीची अधिकृत घोषणा तर झाली आहे पण जागावाटपाचं काय? याची उत्कंठा अनेकांना लागली आहे.

**युतीच्या चर्चांना पूर्णविराम**

मराठीच्या मुद्द्यावरून २० वर्षांनंतर एकाच व्यासपीठावर एकत्र आल्यानंतर गेल्या काही महिन्यांपासून उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या गाठीभेटी वारंवार वाढल्याचे पाहायला मिळाले. त्यासोबतच, कौटुंबिक कार्यक्रमांमध्येही ठाकरे बंधू एकत्र दिसून आले. त्यामुळे हे दोन्ही बंधू राजकीयदृष्ट्या एकत्र येणार असे संकेत मिळाले होते. त्यानंतर संजय राऊत यांनीच युतीसंदर्भात सूतोवाच केल्याने महाराष्ट्रातील महत्त्वपूर्ण युतीवर शिक्कामोर्तब झाला होता. आता एकत्रितरित्या पत्रकार परिषद घेत राज आणि उद्धव ठाकरे यांनी युतीच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

## कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने ची शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने च्या ११ वी शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक दहिगाव-ने येथे दिनांक २४ डिसेंबर रोजी संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा.श्री. काकासाहेब शिंदे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे आयसीएआर 'अटारी' पुणे चे प्रधान शास्त्रज्ञ डॉ. सय्यद शाकिर अली यांची उपस्थिती लाभली.

यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.श्याम सुंदर कौशिक यांनी केव्हीके दहिगाव-ने चा प्रगती अहवालाचे सादरीकरण केले. तर श्री. माणिक लाखे, श्री. नारायण निबे, श्री. सचिन बडधे, श्री. नंदकिशोर दहातोंडे, इंजि. राहुल पाटील व डॉ. चंद्रशेखर गवळी यांनी आपआपले विभागाच्या प्रगती अहवालाचे सादरीकरण केले. या सल्लागार समितीच्या बैठकीस समितीचे सदस्य व महात्मा फुले कृषि




विद्यापीठ राहुरी येथील कृषि तंत्रज्ञान प्रसारक केंद्राचे व्यवस्थापक डॉ. आनंद चवई, कृषिविद्या विभागाचे डॉ. उल्हास सुर्वे, डॉ. दत्तात्रय पाचारणे, उद्यानविद्या विभागाचे डॉ. अन्सार खान अत्तार, 'आत्मा' अहिल्यानगर चे प्रकल्प संचालक श्री.पी.एस.लाटे, राष्ट्रीय कांदा व लसूण संशोधन संचालनालयाचे डॉ. करू अप्पा, राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड राहुरी चे व्यवस्थापक डॉ.सरोज वहाने, ऑल इंडिया रेडिओ अहिल्यानगरचे कार्यक्रम अधिकारी श्री. सुदाम बटुळे, जिल्हा पशु संवर्धन अधिकारी डॉ. दशरथ दिघे, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. बी. पी. शिंदे, महाबीज चे जिल्हा व्यवस्थापक श्री. सुनिल दौंड, बँक ऑफ बडोदा चे व्यवस्थापक श्री. दिपक कुमार सिंह, जिल्हा बीज प्रमाणीकरण अधिकारी श्री. विक्रम अर्णव हे हजर होते. यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे डॉ. सय्यद शाकिर अली यांनी शेतीमध्ये मूल्यवर्धन, यांत्रिकीकरण, हवामान आधारित शेती, आपत्कालीन पीक व्यवस्थापन, चा-यासाठी मुरघास व नैसर्गिक शेती चा प्रसार कृषि विज्ञान केंद्राकडून व्हावा असे नमूद केले. डॉ. आनंद चवई यांनी जमिनीचे व मानवाचे आरोग्य या दोन्ही गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे असे नमूद करताना नाचणी पिकाचे क्षेत्र वाढवण्यास संधी असल्याचे सांगितले. श्री. पी.एस. लाटे यांनी निर्यातक्षम फळपिके बाबत संधी असल्याचे सांगितले तर श्री. सुदाम बटुळे यांनी आकाशवाणी अहिल्यानगर शेती तंत्रज्ञान प्रसार व शेतक-यांच्या हिताकरिता सदैव तत्पर असल्याचे सांगितले. डॉ. वहाने व डॉ. दिघे यांनी जिल्ह्यामध्ये दूध उत्पादन वाढीसाठी कशाप्रकारे संधी उपलब्ध आहेत याबद्दल आपले विचार प्रकट केले. यावेळी शेतकरी प्रतिनिधी सौ. कल्याणी मुरदारे, हुकूम बाबा नवले, शंकर जाधव, भगवान धूत, मुकुंद टाक, संजय तनपुरे, डॉ. शशिकांत शिंदे, दत्तात्रय शेरकर उपस्थित होते. बैठीकीनंतर शास्त्रीय सल्लागार समितीच्या सदस्यांना प्रकाश हिंगे यांनी केव्हीके प्रक्षेत्रावरील चालू असलेल्या उपक्रमांना तसेच विविध प्रकल्पांना भेटी देऊन माहिती दिली.

सदर कार्यक्रमासाठी कृषि विज्ञान केंद्राचे प्रकाश बहिरट, वैभव नगरकर, अनिल देशमुख, प्रविण देशमुख, दत्तात्रय वंजारी, गणेश घुले, संजय थोटे व अनिल धनवटे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राहुल पाटील तर सचिन बडधे यांनी आभार मानले.

## हुतात्म्यांच्या धुतूम गाव उपसरपंचपदी कॉँग्रेसच्या स्मिता ठाकूर बिनविरोध!

**दैनिक युवक आधार**

**उलवे,वार्ताहर :** हुतात्म्यांच्या धुतूम गाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बुधवारी (ता. २४) स्मिता नंदकुमार ठाकूर यांची बिनविरोध निवड झाली.

यावेळी महेंद्रशेठ म्हणाले, "निवडणूक लढताना दिलेली आश्वासने पूर्ण करा. पाण्याचा प्रश्न काही अंशी सुटला आहे, पण तो शंभर टक्के सुटला पाहिजे.

मैदान आणि समाज मंदिर हे प्रश्न लवकरच सुटतील. महिला लढावू आहेत, त्यांना संधी मिळालीच पाहिजे. धुतूम ग्रामपंचायत आणि सर्वच पदाधिकारी चांगले काम करतायत. त्या सर्वांचे अभिनंदन!"



यावेळी सरपंच सुचिता प्रेमनाथ ठाकूर, आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत आणि कार्यकर्ते यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी महेंद्रशेठ घरत आणि ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच आणि सदस्यांनी हुतात्म्यांना अभिवादन केले. धुतूमचे माजी सरपंच शंकर ठाकूर, उद्योजक पी. जी. शेठ ठाकूर, कॉंग्रेसचे उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, डॉ. मनीष पाटील, मिलिंद पाडगावकर, अखलाख शिलोत्री आणि कॉंग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच धुतूमचे नारायण पाटील, राजन कडू, मनोज ठाकूर, राजेश ठाकूर, सुजित ठाकूर, नरेश ठाकूर, दिगंबर ठाकूर, तेजस पाटील, रामचंद्र पाटील, श्याम ठाकूर, प्रल्हाद ठाकूर, प्रसाद ठाकूर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## सिडको–नैना अधिसूचित क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तात्काळ कार्यवाहीचे निर्देश – आ. प्रशांत ठाकूर यांच्या मागणी व पाठपुराव्याला यश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल तालुक्यामधील सिडको व नैना अधिसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याच्या समस्येबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाचे लक्ष वेधून सिडकोने घनकचरा व्यवस्थापन करावे, अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिडकोमार्फत नैना अधिसूचित क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाबाबत तात्काळ कार्यवाही करून त्यासंबंधी प्रस्ताव तयार करण्याचे आणि तो प्रस्ताव तात्काळ मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे तालुक्यातील ४६ गावांचा घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न मार्गी लागणार असून यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचा सातत्यपूर्ण



पाठपुरावा कामी आला आहे.

ग्रामीण भागातील घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीकोनातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी मागणी करून या विषयावर शासनाचे लक्ष केंद्रित केले होते. पनवेल तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती सिडको व नैना अधिसूचित क्षेत्रात येतात. या भागात निवासी, औद्योगिक व वाणिज्यक विकास मोठ्या प्रमाणावर वाढल्याने लोकसंख्या आणि स्थलांतर वाढले आहे. परिणामी कचरा निर्मितीही प्रचंड प्रमाणात होत आहे. नैना अधिसूचित क्षेत्रात एकूण ४६ गावांचा समावेश असून, या सर्व ग्रामपंचायतींच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर घनकचरा निर्माण होत आहे. सध्या ग्रामपंचायती कचरा संकलन करतात. मात्र आर्थिक, तांत्रिक साधनसामग्री व मनुष्यबळाच्या अभावामुळे शास्त्रीय पद्धतीने कचरा प्रक्रिया करणे शक्य होत नाही. कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे व चालवणे ग्रामपंचायतींसाठी खर्चिक आहे. म्हणून सिडको–नैना अधिसूचित क्षेत्रातील ग्रामीण भागात निर्माण होणारा कचरा सिडकोच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामार्फत प्रक्रिया करणे आवश्यक आहे. प्रक्रिया व वाहतूक खर्च ग्रामपंचायतींना परवडणारा नसल्याने सिडकोने ग्रामपंचायतींसोबत करार करून प्रक्रिया खर्च माफ केल्यास आणि कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारल्यास ग्रामीण भागात आदर्श घनकचरा व्यवस्थापन शक्य होईल, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोला सूचित केले होते. त्या अनुषंगाने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर सिडकोकडून संबंधित ग्रामपंचायतींना प्रत्येक गावाची लोकसंख्या, दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे प्रमाण तसेच सद्यस्थितीत त्या कचऱ्याचे व्यवस्थापन कशा पद्धतीने केले जाते, याबाबत सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या विषयावर सविस्तर चर्चा व पुढील कार्यवाहीसाठी मंगळवार दिनांक ३० डिसेंबरला दुपारी ०२ वाजता बेलापूर सिडको भवन येथे बैठक होणार असून एकात्मिक व शास्त्रीय पद्धतीने कचरा व्यवस्थापन होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# मनोज गॅस एजन्सीवर कारवाई होणार का !

## पुरवठा अधिकारी सुमित्रा ईलमिले यांचे गॅस एजन्सीवर मालक यांच्यावर आशीर्वाद ........?

## उदगीरमध्ये घरगुती गॅसची अवैध विक्री ; अतिरिक्त ३० रुपयांची बेकायदेशीर वसुली सुरू

**दैनिक युवक आधार**

**उदगीर प्रतिनिधी (बालाजी तेलंगे ) :** उदगीर शहरात घरगुती स्वयंपाक गॅसचा सर्रास गैरवापर होत असून, हॉटेल, मंगल कार्यालये, चायनीज गाड्या तसेच खाद्य व्यवसाय करणाऱ्या अनेक ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने घरगुती सिलिंडरचा वापर केला जात आहे. याशिवाय ग्राहकांना होम डिलिव्हरी देताना अधिकृत गॅस किमतीव्यतिरिक्त प्रत्येकी ३० रुपयांची अतिरिक्त वसुली केली जात असल्याचे उघड झाले आहे. या गंभीर प्रकाराकडे पुरवठा विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.




उदगीर शहर व तालुक्यातील अनेक भागांत घरगुती वापरासाठी उपलब्ध असलेला एलपीजी गॅस मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक वापरासाठी वळवला जात आहे. शासनाकडून अनुदान देऊन दिला जाणारा घरगुती गॅस केवळ घरगुती वापरासाठी असताना, प्रत्यक्षात तो हॉटेल, मंगल कार्यालये, चायनीज गाड्या, खानावळी तसेच विविध खाद्य स्टॉलवर खुलेआम वापरला जात आहे. नियमांनुसार अशा ठिकाणी व्यावसायिक गॅस सिलिंडर वापरणे बंधनकारक असतानाही संबंधित नियमांकडे दुर्लक्ष केले जात आहे. उदगीर येथील मोठी असलेली मनोज गॅस वितरकाकडून ग्राहकांना सिलिंडरची होम डिलिव्हरी देताना अधिकृत दरापेक्षा प्रत्येकी ३० रुपयांची वेगळी रक्कम आकारत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. ही रक्कम कोणतीही पावती न देता घेतली जात असून, वाहतूक खर्च किंवा इतर शुल्क अशा नावाखाली बेकायदेशीर वसुली केली जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांची आर्थिक पिळवणूक होत आहे. शहरातील अनेक ठिकाणी अवैध वापर उघडपणे दिसत असतानाही व पुरवठा विभाग यांना पुरावे देऊन सुधा पुरवठा विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याने संशय व्यक्त केला जात आहे. अचानक तपासण्या, सिलिंडर जप्ती किंवा दंडात्मक कारवाई क्वचितच होत असल्याने संबंधित व्यावसायिकांना मोकळे रान मिळाले आहे. याचा थेट परिणाम शासनाच्या अनुदान योजनेवर होत असून, खऱ्या गरजू ग्राहकांवर त्याचा बोजा पडत आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून अवैध गॅस विक्री करणाऱ्या एजन्सी मालक व कर्मचारी यांच्यावर योग्य कारवाई करून, व घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर आणि अतिरिक्त वसुली करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच नियमित तपासणी मोहीम राबवावी, अशी जोरदार मागणी उदगीरमधील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# पारंपरिक खालुबाजाच्या गजरात श्रीवर्धनमध्ये ऐतिहासिक विजयी मिरवणूक

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** श्रीवर्धन नगर परिषदेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार मा. श्री. अतुल चौगुले यांनी दणदणीत आणि ऐतिहासिक विजय संपादन केल्यानंतर आज श्रीवर्धन शहरात पारंपरिक खालुबाजाच्या गजरात भव्य विजयी मिरवणूक काढण्यात आली.दुपारी ठीक तीन वाजता मिरवणुकीस सुरुवात झाली. पारंपरिक वेशभूषेत सजलेले खालुबाजावाले, ढोल-ताशांचा निनाद, नाचत-गात आनंद साजरा करणारे कार्यकर्ते, भगवे झेंडे, फुलांची उधळण आणि "जय शिवसेना", "जय महाराष्ट्र"च्या जोरदार घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले होते. श्रीवर्धनमधील प्रमुख रस्त्यांवरून मिरवणूक मार्गस्थ होत असताना नागरिकांनी ठिकठिकाणी उस्फूर्त स्वागत करत विजयानंद व्यक्त केला. या विजयी मिरवणुकीत महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. हा विजय केवळ एका उमेदवाराचा नसून श्रीवर्धनच्या सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाचा आणि विकासाभिमुख विचारांचा विजय




असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. सदर विजयी मिरवणुकीसाठी शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख अनिलजी नवगणे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख प्रमोदजी घोसाळकर यांच्यासह राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व मनसेचे स्थानिक नेते उपस्थित होते.या भव्य मिरवणुकीचे नियोजन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) शहरप्रमुख शिवराज चाफेकर, उपशहरप्रमुख अजिंकेश भाटकर, स्थानिक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी केले होते. पारंपरिक संस्कृती, लोकशाहीचा उत्सव आणि जनतेचा प्रचंड उत्साह यांचा अनोखा संगम ठरलेली ही विजयी मिरवणूक श्रीवर्धनच्या राजकीय इतिहासात कायम स्मरणात राहील, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

# १०६ वर्षीय लक्ष्मीबाई भोईर यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल तालुक्यातील सावळे येथील ज्येष्ठ व आदरणीय नागरिक लक्ष्मीबाई आंबो भोईर यांचे वृद्धापकाळाने वयाच्या १०६ व्या वर्षी दुःखद निधन झाले. दीर्घायुष्य लाभलेल्या लक्ष्मीबाई भोईर यांनी कुटुंब व समाजाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलला होता.



त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा व आप्तेष्टांनी भरलेला परिवार आहे. लक्ष्मीबाई भोईर या प्रेमळ, शांत, हसतमुख व मायेने सर्वांना आपलेसे करणाऱ्या स्वभावाच्या होत्या. त्यामुळे त्या गावात सर्वत्र आदराने 'आई' या नावाने ओळखल्या जात होत्या. त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकावर त्यांनी आपल्या मायेची छाया पसरवली होती. त्यांच्या अंत्ययात्रेस सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थ, नातेवाईक व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांचा दशक्रिया विधी बुधवार दिनांक ३१ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र गुळसुंदे येथे होणार असून उत्तरकार्य शनिवार दिनांक ०३ जानेवारी रोजी सावळे येथील त्यांच्या राहत्या घरी होणार आहे.

# सिल्लोडमध्ये कापूस खरेदीवरून सेना–भाजपमध्ये ठिणगी ; शिवसेनेचे आंदोलन म्हणजे 'राजकीय नौटंकी' !

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** कापूस खरेदीच्या परवानगीवरून सिल्लोड तालुक्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सोमवारी शिवसेनेच्या वतीने करण्यात आलेल्या रस्ता रोको आंदोलनाचा समाचार घेताना, भाजपचे प्रदेश सचिव सुरेश बनकर यांनी या आंदोलनाला 'राजकीय नौटंकी' असे संबोधले आहे. सत्तेत असूनही आणि बाजार समिती ताब्यात असूनही आंदोलन करणे, ही तालुक्यासाठी दुर्दैवी बाब असल्याची टीका बनकर यांनी केली आहे.सुरेश बनकर यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींवर गंभीर आरोप करत म्हटले की, बाजार समितीकडे अनेक जिनिंग मालकांनी सीसीआयच्या कापूस खरेदीसाठी परवानगी मागितली आहे. मात्र, आमदार अब्दुल सत्तार आणि त्यांच्या निकटवर्तीयांच्याच जिनिंगांना परवानगी देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ज्या क्रमाने अर्ज आले आहेत, त्याच अनुक्रमानुसार परवानगी मिळायला हवी, असा आग्रह भाजपने धरला आहे. मात्र, केवळ स्वतःच्या मर्जीतील जिनिंग मालकांचा फायदा करून देण्यासाठी सत्तेचा गैरवापर केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

शासनाने आधीच तालुक्यातील १५ जिनिंगांना कापूस खरेदीची परवानगी दिलेली आहे. असे असतानाही बाजार समिती



जाणीवपूर्वक अडवणूक करून 'ना हरकत प्रमाणपत्र' (NOC) देण्यास टाळाटाळ करत आहे. तालुका कापूस उत्पादनात अग्रेसर असल्याने जास्तीत जास्त जिनिंग सुरू झाल्यास शेतकऱ्यांची सोय होईल. मात्र, केवळ ठराविक जिनिंगसाठीच अट्टहास का? असा संतप्त सवाल भाजपने उपस्थित केला आहे.

**आता भाजप रस्त्यावर उतरणार!**

शिवसेनेचे आंदोलन हे केवळ जनतेची दिशाभूल करण्यासाठी असून, प्रशासनावर दबाव टाकण्याचा हा केविलवाणा प्रयत्न आहे. जर बाजार समितीने येत्या दोन दिवसांत सर्व पात्र जिनिंगांना परवानगी दिली नाही, तर भारतीय जनता पक्षाच्या वतीने तीव्र रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही सुरेश बनकर यांनी यावेळी दिला आहे.या आरोप-प्रत्यारोपामुळे आता कापूस खरेदीचा प्रश्न सिल्लोडमध्ये चांगलाच पेटण्याची चिन्हे दिसत आहेत




दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या रौप्य महोत्सवाचा शानदार उद्घाटन सोहळा संपन्न

## चाळीसहून अधिक जण रायगड जिल्हा स्तरीय द्रोणागिरीभूषण पुरस्काराने सन्मानित !!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी. भोईर**

सोमवार दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी बोकडविरा येथील नवी मुंबई सेझ मैदानावर कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या अध्यक्षतेखाली आणि माजी आमदार श्री मनोहरशेठ भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन चा २५ वा महोत्सवाचा शानदार उद्घाटन सोहळा द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री महादेव घरत यांच्या हस्ते करण्यात आले.

क्रीडापटूनी द्रोणागिरी देवी करंजा येथून क्रीडाज्योत प्रवीण घरत ,राम सर,सरोज कदम,प्रियांशी पाटील, भरत म्हात्रे आणि त्यांच्या साथीदारानी मैदानात आणली. मैदानात एक फेरी मारून तिने अध्यक्ष महादेव घरत यांनी मैदानातील ज्योत प्रज्वलीत केली. महेंद्रशेठ घरत यांनी फ्लॅग फडकवला. यावेळी विविध शाळेतील विद्यार्थांनी लेझिम, कवायत आणि आगरी कोळी नृत्याने उपस्थितांची मने जिंकली.यावेळी गेल्या २५ वर्षात ज्या सदस्यांचे दुःखद निधन झाले आहे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.सर्व खेळाडूना क्रीडाशपथ देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवन आणि सुप्रसिद्ध कवी अरुण द म्हात्रे यांच्या स्वागतगीताने झाली.प्रास्ताविकात अध्यक्ष महादेव घरत यांनी २५ वर्ष सातत्याने प्रयत्न करून देखील उरण साठी



हक्काचे मैदान मिळाले नसल्याची खंत व्यक्त केली.

माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी या रौप्य महोत्सवात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले.याचबरोबर दरवर्षी या महोत्सवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सरदारांचे वंशज उपस्थित राहतात याबद्दल धन्यवाद दिले.कार्यक्रमाचे अध्यक्ष महेंद्र घरत म्हणाले की द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन २५ वर्ष दिमाखात चालू आहे .याचे श्रेय महादेव घरत आणि त्यांच्या सोबत असलेल्या द्रोणागिरी स्पोर्ट्स च्या सदस्यांना जाते.द्रोणागिरी स्पोर्ट्स मुळे रायगड जिल्ह्यातील खेळाडूंना व्यासपीठ मिळाले असून द्रोणागिरी भूषण पुरस्काराने काम करणाऱ्यांना अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा ,ऊर्जा मिळते असे सांगून द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन साठी यावर्षी आणि दरवर्षी एक लाख रुपये देण्याची घोषणा त्यांनी केली.यावेळी मंचावर संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख मिलिंद खारपाटील, उपाध्यक्ष मनोज पडते, खजिनदार शिवेंद्र म्हात्रे, सचिव दिलीप तांडेल, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पायदळाचे प्रमुख पिलाजी गोळे यांचे वंशज मनोहर गोळे,कवी पुंडलिक म्हात्रे , बुद्धिबळ चे प्रमुख संदीप पाटील , होप मिरर फाऊंडेशन चे अध्यक्ष फिरोज शेख,रायगड क्वीन मधु मिलिंद निमकर,सिने अभिनेत्री सरिता खेरवासिया, शुभांगिनी पाटील, प्रज्ञा म्हात्रे,रायगड जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या वैशालीताई घरत,वैद्यकीय सेवेतील भक्ती घरत आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी रायगड जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थाना द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले..

यानंतर सौ वैशाली ताई घरत यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदक नितेश पंडित यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन चे सर्वच सदस्य विशेष मेहनत घेत होते.

---

## योगेश ढवारे यांचे विभागीय स्वरचित काव्यवाचन स्पर्धेत यश राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज बाबासाहेब विद्यालयातील सहशिक्षक श्री योगेश ढवारे यांनी शिक्षक ,अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी आयोजित विभागीय स्वरचित काव्य वाचन स्पर्धेत यश संपादित केले आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई येथे संभाजीनगर विभागीय स्वरचित काव्य वाचन स्पर्धा संपन्न झाली.

या विभागीय स्पर्धेत प्रत्येक तालुक्यातून एक अशा 42 स्पर्धकातून एकूण 4 स्पर्धक हे राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत या स्पर्धेत योगेश ढवारे यांनी सादर केलेल्या काव्य



रचनेने यश संपादन करून राज्य स्तरासाठी ते पात्र ठरले आहेत.त्यांच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, केंद्र प्रमुख एकनाथ जाधव, समन्वयक अंजली पद्माकर,श्री के बा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष एड अनिरुध्द जोशी, उपाध्यक्ष डॉ सुनिल कुलकर्णी, सचिव महेश खारकर, सहसचिव अभय सुभेदार तथा संचालक मंडळ आदिसह मुख्याध्यापक संजय धारासुरकर, सिद्धार्थ एडके यांनी अभिनंदन केले आहे.

---

## २० टक्के सेस मधुन चार लाभार्थ्यांना वाहनांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**महेश साळुंके/लासलगाव प्रतिनिधी** : लासलगांव येथे जिल्हा परिषद २०% सेस समाज कल्याण विभाग अंतर्गत अनु- जातीच्या बेरोजगारांना चारचाकी वाहन पुरविणे या योजने अंतर्गत ग्रामपंचायत लासलगांव कडुन ५ लाभार्थ्यांचे प्रस्ताव सादर करण्यात आलेले होते. त्यापैकी अमोल शेजवळ, अजय थोरात, योगेश शेजवळ, प्रेम सोनवणे या चार लाभार्थ्यांची निवड समितीकडुन निवड झालेली आहे. या लाभार्थ्यांना मिळालेल्या गाड्यांमध्ये महिंद्रा व टाटा कंपनीच्या गाड्या असुन अंदाजे र.रु. ३६.०७ लक्ष




किंमत आहे. लाभार्थ्यांना एकुन ८ लक्ष रुपयांचा लाभ मिळाला आहे. आज दि. २३ डिसेंबर रोजी लासलगांव ग्रामपंचायतीचे प्रांगणामध्ये या चार लाभार्थ्यांना गाड्यांचे वितरण करण्यात आले.

निवड झालेल्या लाभार्थ्यांना मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक जयदत्त होळकर, सरपंच योगिता पाटील, उपसरपंच रामनाथ शेजवळ, यांच्या हस्ते तसेच ग्रा.पं. सदस्य चंद्रशेखर होळकर, सुवर्णा जगताप, रोहीत पाटील, अमोल थोरे, पुष्पा आहिरे, अमिता ब्रम्हेचा, अश्विनी बर्डे, ज्योती निकम, ग्रामपंचयत अधिकारी संजय बाविस्कर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये वाहनाचे वितरण करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या वतीने २० टक्के सेसच्या माध्यमातुन समाज कल्याण विभागाकडुन लासलगांव येथील ४ अनु.जातीच्या बेरोजगारांना मिळालेल्या गाड्यांमुळे चार कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटणार आहे.

तसेच यामुळे लाभार्थी कुटुंबांमध्ये आनंदाचे वातावरण बघायला मिळाले. सदर प्रसंगी ग्रामपंचायत कर्मचारी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## आमणी बु. येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेहबंध, कृतज्ञता व सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव ( यवतमाळ) :** प्रियदर्शनी शिक्षण संस्था द्वारा संचालित टी. जी. देशमुख प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा आणि वनमलाताई राठोड कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, आमणी बु. (ता. महागाव) येथे ‘कृतज्ञता व सन्मान समारंभ तथा माजी विद्यार्थी स्नेहमिलन सोहळा-२०२५’ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित या सोहळ्याने जुन्या आठवणींना उजाळा देत, गुरु-शिष्यांच्या नात्यातील ओलावा पुन्हा एकदा अधोरेखित केला.

**आठवणींचा आणि नात्यांचा उत्सव**

दैनंदिन धावपळीच्या आणि व्यस्त जीवनातून



वेळ काढून शेकडो माजी विद्यार्थी या सोहळ्यासाठी आपल्या शाळेच्या अंगणात एकत्र आले होते. "आजचा हा सोहळा म्हणजे केवळ एकत्र जमण्याचा प्रसंग नसून, आपल्या स्नेहबंधनांना अधिक घट्ट करणारा आणि गोड आठवणींच्या गाठी बांधणारा एक सुंदर सोहळा आहे. हे स्नेहमिलन म्हणजे आपल्या नात्यांचा उत्सव आहे," अशा शब्दांत यावेळी भावना व्यक्त करण्यात आल्या.

**सोहळ्याचे प्रमुख आकर्षण:**

**गुरुवर्य सन्मान**

ज्या शिक्षकांनी आयुष्याला आकार दिला, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

**अनुभव कथन**

माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील गमतीजमती आणि आपल्या प्रगतीचा प्रवास मांडला.

**शुभेच्छांची देवाणघेवाण**

रोजच्या गडबडीत हरवून गेलेल्या मैत्रीच्या क्षणांना पुन्हा नव्याने जगण्याची संधी या निमित्ताने सर्वांना मिळाली.

**पुढील वाटचालीस शुभेच्छा**

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व माजी विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी संस्थेच्या वतीने आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शुभेच्छा देण्यात आल्या. जीवनातील हा छोटासा क्षण आपल्याला आयुष्यभरासाठी मोठ्या आठवणी देऊन जातो, असा सूर याप्रसंगी उमटला. या सोहळ्यामुळे आमणी बु. परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि माजी विद्यार्थी प्रतिनिधींनी परिश्रम घेतले.

---

## 35 वर्षाच्या एकहाती सत्तेला सुरुंग लावत शिवसेना नेते आसेफ खान पाथरी नगराध्यक्ष पदवी वीराजमान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** मागील 35 वर्षाची एकहाती सत्ता उलटून पाथरी नगराध्यक्षपदी आसेफ खान शिवसेना नेते यांनी स्वतःकडे नगराध्यक्ष पद खेचून आणले ही निवडणूक अत्यंत अटीतटीच्या संघर्षात लढली गेली, एकहाती सत्ता असलेली 35 वर्षाची राजकीय कारकीर्द पणाला लागली होती तर दुसरीकडे आपले नवे वर्ष वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर संघर्ष चालू होता.

यात शिवसेना नेते सईद खान यांनी आपली पूर्ण ताकद या निवडणुकीत उभा केली होती. जनतेने ही निवडणूक आपल्या हाती घेतल्याने शिवसेना नगराध्यक्ष पद मिळून दिले असे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे, या निवडणुकीत अजित पवार गटाचे विद्यमान आमदार राजेश दादा विटेकर यांनीही नगर परिषद पाथरी निवडणूक प्रतिष्ठेची केली होती पण त्यांना या निवडणुकीत मानावे तेवढे यश मिळू शकले नाही,

पाथरी नगर परिषद निवडणूक या मध्ये एकूण 23 नगरसेवकांसाठी मतदान झाले होते यात सर्वाधिक जागा 12 ह्या काँग्रेसच्या निवडून आल्या त्या नंतर 09 जागा ह्या शिवसेना या पक्षाच्या आल्या तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांना 02 जागांवर समाधान मानावे लागेल.या निवडणुकीत सर्वाधिक चर्चा रंगली की प्रभाग क्रमांक 11 ची.

प्रभाकर क्रमांक 11 मध्ये अत्यंत सुरुवातीपासून शेवटपर्यंत चुरचशी लढाई पाहताना मिळाली.या निवडणुकीत प्रभाग क्रमांक 11 ने ठरवले नगराध्यक्ष पदाचे भवितव्य यात सर्वाधिक मत हे शिवसेना या पक्षाला मिळाल्याने हा शिवसेना पक्षाचा विजय मानला जातो.प्रभाग



क्रमांक 11 हाच गेम चेंजर म्हणून पुढे आलायांनी 35 वर्षाची एक हाती सत्ता उलटून लावली असे राजकीय वर्तुळात मोठ्या प्रमाणात चर्चा आहे.

सुरुवातीपासून काँग्रेस पक्षाचे जुनेद खान हे आघाडीवर असताना , त्यांना 682 मताची आघाडी होती त्या नंतर शिवसेनेचे आसेफ खान तिसऱ्या फेरीत 93 मतांनी तर चौथ्या फेरीत 19 मतांनी पाचव्या फेरीत 123 मतांनी तर शेवटच्या फेरीत 436 मतांनी आघाडी घेत विजयी झाले.

त्यांना 10 हजार 626 तर जुनेद खान यांना 10 हजार 190 मते मिळाली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे माजी नगराध्यक्ष मोहिम अन्सारी यांना 5 हजार 372 मते मिळाली. पाथरी नगरपरिषद निवडणूक मध्ये माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांच्या पॅनलमधून गतवर्षी निवडून आलेले अनेक नगरसेवक यंदाच्या निवडणुकीत पराभूत झाले. अखेरच्या टप्प्यामध्ये लक्ष्मी अस्त्राचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्याचे चर्चा रंगली होती. या निवडणुकीत सर्वाधिक मोठा धक्का बसला तो मंजे माजी आमदार बाबाजानी दुरानी यांना यांची एक हत्ती सत्ता असलेली नगरपरिषद पाथरी 35 वर्षाची राजकीय कारकिर्दीचा बुरुज ढासळला.पुढील कालखंडामध्ये पाथरी चा विकास कसा होतो तो बघावा लागेल.

---

## अखेर चांडस ते नावली रस्त्यांचे कामं सुरू; पत्रकार गोपाल बोरकर यांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** तालुक्यातील चांडस ते नावली रस्त्याची दुरवस्था झालेली होती आणि बरेच वेळा प्रसिद्ध माध्यमांतून बातमी प्रसिद्ध करण्यात आल्या असून यांची दखल वाशिम जिल्हा बांधकाम विभाग सोनल साहेब यांनी घेऊन त्यांनी डिपटी इंजिनियर व ठाकरे जेई यांना सुचना देऊन संबंधित ठेकेदार यांना धारेवर धरले व कामं चालू करन्याचे आदेश



दिले या मध्ये साधारण पणे दोन महिने या सर्व गोष्टींचा ठाकरे साहेब यांच्या कडे सातत्याने पाठपुरावा सुरू होता व ठाकरे साहेब यांनी सुद्धा मोलाचं सहकार्य केले पण एक सामान्य माणूस काय करणार अशी भावना मनात संभ्रम निर्माण करून ठेकेदार कामाला सुरुवात करण्यासाठी टाळा टाळ करत असतील असे वाटत होते गोपाल बोरकर यांच्या मागे कोणताही राजकीय वरदहस्त नसुन ते सामान्य घरातील असुन एकमेव पत्रकारिता याच माध्यमातून हे सर्व काम ठाकरे साहेब यांच्या व मेन सोनल साहेब यांच्या सहकाऱ्यांनी अखेर काम चालू करून दाखवण्यात यश आले.

---

## मुंबईचे लचके तोडले जात आहे, गुजरातच्या दावणीला मुंबईला बांधले जात आहे, वडेट्टीवार यांची राज्य सरकारवर टीका

### ठाकरे बंधू यांनी युतीची घोषणा केली, कुटुंब एकत्र आले त्यांना आमच्या शुभेच्छा

### काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केली भूमिका

**दैनिक युवक आधार**

**नागपूर / प्रतिनिधी :** महाराष्ट्रावर,मुंबईवर अतिक्रमण सुरू आहे. मुंबई बळकावण्याचा, मुंबईला गुजरातच्या दावणीला बांधण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे मुंबई वाचवण्यासाठी, तिचे रक्षण करण्यासाठी लढले पाहिजे अस काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार म्हणाले.

नागपुरात माध्यमांशी बोलताना वडेट्टीवार यांनी महायुती सरकारच्या धोरणावर टीका केली. मुंबईतील जमिनी गिळण्याचे काम सुरू आहे,मुंबईवर गुजरातचे नियंत्रण आता दिसू लागले आहे. त्यामुळे मराठी अस्मिता, मराठी संस्कृती रक्षणासाठी लढावे लागणार.मुंबईत उद्धवजी ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू एकत्र आले त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत. कुटुंब एकत्र येत असेल तर आनंदच आहे.मुंबई महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेसची तयारी ही उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षाबरोबर निवडणूक लढण्याची होती,मनसे बाबत मात्र जाण्याची काँग्रेसची तयारी नव्हती अस वडेट्टीवार यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडी होती,विधान सभा निवडणुकीत महाविकास आघाडी होती.पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असतात. नगरपरिषद, नगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र लढली नाही,आघाडीचे निर्णय हे स्थानिक पातळीवर असतात यातून इंडिया आघाडी किंवा महाविकास आघाडीला धक्का लागला अस मानण्याचे कारण नाही असे ही काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार म्हणाले.

काँग्रेस हा पक्ष जातीयवाद, धर्मवाद करत नाही.

काँग्रेस हा संविधान मानणारा आणि प्रत्येक घटकाला न्याय देणारा पक्ष आहे त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत विकासासाठी आमच्या पाठीशी जनतेने उभे रहावे असे आवाहन यावेळी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केले.

# शिक्षणाची सिडी' ठरली अव्वल; वैनतेय प्राथमिक विद्यामंदिराच्या शिक्षकाची जिल्हास्तरावर निवड

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** शिक्षण विभाग पंचायत समिती निफाड, तालुका विज्ञान अध्यापक संघ निफाड तसेच गोखले एज्युकेशन संचलित एच. ए. एल. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, ओझर टाऊनशिप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे निफाड तालुका विज्ञान प्रदर्शन मोठ्या उत्साहात पार पडले. या प्रदर्शनात वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर, निफाड येथील शिक्षक गोरख सानप यांनी सादर केलेल्या 'शिक्षणाची सिडी' या शैक्षणिक साहित्याने प्रथम क्रमांक पटकावला.

प्राथमिक गटातून एकमेव ठरलेल्या या साहित्याची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली आहे. प्रदर्शनाच्या बक्षीस वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते सानप यांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

तंत्रज्ञानातील बदलामुळे कालबाह्य ठरलेल्या व टाकाऊ झालेल्या कॉम्पॅक्ट डिस्क (सी.डी.)



यांचा पुनर्वापर करून सानप यांनी हे शैक्षणिक साहित्य विकसित केले आहे. भाषा, गणित, इंग्रजी, विज्ञान अशा सर्व विषयांसाठी उपयुक्त ठरणारे हे साहित्य विद्यार्थ्यांना सहज, आनंददायी व परिणामकारक अध्यापन अनुभव देते. टाकाऊतून टिकाऊ या संकल्पनेवर आधारित हे साहित्य पाहण्यासाठी तालुक्यातील शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.सानप यांच्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, शिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद तसेच पालकांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# हेन्केल ॲडेहेसिव्हज टेक्नॉलॉजीज इंडियातर्फे बालग्राम येथे सौर प्रकल्पाचे उदघाटन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** बालग्राम महाराष्ट्र संचलित पंचदिप संकुल बालग्राम ही खांदा कॉलनी, पनवेल स्थित संस्था समाजातील अनाथ व निराधार मुलांचे पालन-पोषण, संगोपन आणि पुनर्वसन करणाऱ्या संस्थेकरीता हेन्केल ॲडेहेसिव्हज टेक्नॉलॉजीज इंडिया प्रा. लि. नवी मुंबई यांच्या सहकार्यातून ३० के. व्ही. चा सौर प्रकल्प देण्यात आला. या सौर प्रकल्प हस्तांतरण आणि उद्धाटन सोहळा दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी बालग्राम येथील सभागृहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



बाल कल्याण समिती, रायगडचे अध्यक्ष श्री. जगन्नाथ साळुंके उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून बालग्राम महाराष्ट्र पुणे चे उपाध्यक्ष ॲड. श्री. मंगेश नेने, बालग्राम महाराष्ट्र पुणे प्रतिनिधी श्रीमती. तुलसी मॅडम, हेन्केल ॲडेहेसिव्हज टेक्नॉलॉजीज इंडिया प्रा. लि. नवी मुंबई कंपनीचे प्रमुख अतिथी श्री. कृष्णा प्रसाद, डॉ. प्रसाद खांडगाळे, श्री. भूपेश सिंग, श्री. शोभित रस्तोगी, श्री. रमित महाजन व या प्रकल्पाचे सी.एस.आर. समन्वयक श्री. संदिप पेटकर त्याच बरोबर खांदेश्वर पोलिस स्टेशन वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीमती. स्मिता ढाकणे, पत्रकार मित्र असोसिएशनचे श्री. केवल महाडीक, ग्रेसफुल हॅन्डस ट्रस्टच्या श्रीमती. पायल मॅडम, लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या श्रीमती. जयंती हळदीपुरकर, भूपेंद्र मार्शल आटर्सचे श्री. महेश गायकवाड याच बरोबर बाल कल्याण समिती, रायगडचे सदस्य डॉ. विशाल गाणार, ॲड. शुभांगी झेमसे, श्री. राम मस्के तसेच बालग्रामच्या अध्यक्षा श्रीमती. मिनल टिपणीस, सदस्या ॲड. डॉ. निता कदम, डॉ. समिधा गांधी व बालग्रामचे सामाजिक कार्यकर्ते व मुले उपस्थित होती.

पंचदिप संकुल बालग्राम करीता केलेल्या ३० के. व्ही. सौर प्रकल्पा बद्दल बाल कल्याण समिती, रायगड यांच्या कडून हेन्केल ॲडेहेसिव्हज टेक्नॉलॉजीज इंडिया प्रा. लि. नवी मुंबई या कंपनीचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थित मान्यवरांचा ही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन बाल कल्याण समिती रायगड व पंचदिप संकुल बालग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आला होता. पंचदिप संकुल बालग्राम संस्थेतील मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमांचे सूत्र संचालन पंचदिप संकुल बालग्राम अधिक्षक डॉ. विनायक पाटील यांनी केले तर आभार बालग्राम महाराष्ट्र पुणेचे कार्यकारी संचालक डॉ. अशोक घाडगे यांनी मानले.


# चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज , न्यू पनवेल (अधिकारप्रदत्तस्वायत्त) महाविद्यालयातील कौशल्याधारीत उपक्रमांचे संपर्क अभियान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** "आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ पदवीशिक्षण घेऊन न थांबता कौशल्याधिष्ठित आणि व्यावहारिक शिक्षण आत्मसात करणे आवश्यक आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी,इंटीरियर डिझाईनसारखे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल करिअरसाठी नवी दारे उघडतात," असे प्रतिपादन सी.के.टी. आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी केले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज मधील भागूबाई चांगू ठाकूर कौशल्य विकास केंद्राच्या वतीने महाविद्यालयात आयोजित केलेल्या दोन दिवसीय संपर्क अभियानाच्या (Outreach Programme) उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. भागूबाई चांगू ठाकूर कौशल्य विकास केंद्राच्या अंतर्गत आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग, सायबर सिक्युरिटी व डिजिटल फॉरेन्सिक, इंटिरियर डिझाईन तसेच फॅशन व ॲपरेल डिझाईन असे कौशल्याधारित अभ्यासक्रम चालवले जातात.

या अभ्यासक्रमाची माहिती अधिकाधिक युवकांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग तसेच सायबर सिक्युरिटी व डिजिटल फॉरेन्सिक विभाग समन्वयक समीर कांबळे, इंटिरियर डिझाईन पदवी अभ्यासक्रम समन्वयक आर्किटेक्ट स्वेच्छा गोसावी, इंटिरियर डिझाईन डिप्लोमा अभ्यासक्रम समन्वयक प्रज्योती देसाई आणि फॅशन व ॲपरेल डिझाईन विभाग समन्वयक दीपश्री राठोड यांच्या प्रयत्नांतून हे संपर्क अभियान राबवण्यात आले. या उपक्रमास विज्ञान विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. ज्योत्स्ना ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाचे उद्धाटन प्रसंगी प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांच्या सोबत अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. डॉ. बी. डी. आघाव आणि विज्ञान विभाग प्रमुख प्रा. डॉ. ज्योत्स्ना ठाकूर हे देखील उपस्थित होते. कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमाची सुरुवात संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांच्या पुढाकाराने आणि संस्थेचे अध्यक्ष आदरणीय लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मान्यतेने करण्यात आली. या अभ्यासक्रमांच्या वतीने आयोजित विभागीय प्रदर्शनास उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख यांनी भेट देत विद्यार्थ्यांना आपल्या अनुभवातून बहुमोल मार्गदर्शन केले.या संपर्क अभियानामध्ये चार विविध शैक्षणिक संस्थांमधील सुमारे ४५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत कनिष्ठ महाविद्यालय येथून ९० विद्यार्थी श्री. जयराम सोनटक्के, श्री. एम. के. घरत व सौ. तांडेल मॅडम या तीन प्राध्यापकांसह उपस्थित होते. त्याच दिवशी सी.के.टी. कनिष्ठ महाविद्यालय, पनवेल येथून १५० विद्यार्थ्यांनी सौ. ज्योती वाघ, सौ. हर्षदा लोखंडे, सौ. माधवी कोळी , श्री. विजय कुमावत , श्री. गणेश पाटील व श्री. विवेक पाटील या सहा



प्राध्यापकांसह या प्रदर्शनास भेट दिली.

शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ रोजी लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कामोठे येथून १३२ विद्यार्थी सौ. अमृता गुरव, सौ. सरिता सोमाणी, आणि सौ. स्मिता शर्मा या तीन प्राध्यापकांसह उपस्थित होते.

त्याच दिवशी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर येथून ७५ विद्यार्थी सौ. दुर्गादेवी मौर्या, सौ. अश्विनी कासरेकर, सौ. स्नेहल अवळे या तीन प्राध्यापकांसह संपर्क अभियानास उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक नम्रता कडू आणि इंग्रजी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक कादंबरी पाटील यांनी प्रभावीपणे केले.या संपर्क अभियानादरम्यान विविध विभागांद्वारे अभ्यासक्रमांची माहिती, अभ्यासक्रमाची रचना तसेच करिअरच्या संधी याविषयी सविस्तर सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना संबंधित विभागांमध्ये नेऊन प्रत्यक्ष प्रात्यक्षिके व विभागीय प्रदर्शने दाखविण्यात आली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक प्रकल्प व सर्जनशील कलाकृतींमुळे विद्यार्थ्यांना विविध विषयांचे व्यावहारिक पैलू प्रत्यक्ष अनुभवता आले.

सर्व सहभागी विभागांतील प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे हे संपर्क अभियान उपक्रम अत्यंत यशस्वी ठरले. विविध कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रदर्शनांचे विशेष कौतुक करत महाविद्यालयातील आधुनिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांबद्दल उत्सुकता व्यक्त केली.

एकूणच हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये आंतरशाखीय शिक्षण, कौशल्यविकास आणि शैक्षणिक जागरूकता निर्माण करणारा ठरला.

# डॉ .उमाकांत बिरादार यांची सहयोगी प्राध्यापकपदी पदोन्नती



**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे :** कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय हणेगाव येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ.उमाकांत अन्नेप्पा बिरादार यांची सहाय्यक प्राध्यापक पदावरून सहयोगी प्राध्यापक पदावर पदोन्नती करण्यात आली.या पदोन्नती समिति मध्ये कुलगुरु प्रतिनिधि डॉ.पूनम नथनी,डॉ.सुधीर वाघ हे उपस्थित होते.तर विषयतज्ञ म्हणून डॉ.इंगोले,डॉ.संजय जाधव यांची उपस्थिति होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंचशील एकंबेकर,संस्थेचे कार्यवाहक डॉ.चरण सिंग राठोड हे उपस्थित होते. यांच्या या यशासाठी संस्था अध्यक्ष रामराव राठोड तसेच स्वरूप राठोड महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व मित्रपरिवार यांनी या यशासाठी शुभेच्छा दिल्या.

# सिल्लोडचा 'वाळू'वाडा : गरिबांच्या घरकुलांची राखरांगोळी!

## बावनकुळेंची घोषणा हवेत विरली; भ्रष्ट अधिकाऱ्यांनी ९ हजार स्वप्नांचा गळा घोटला!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** सरकारने घोषणा केली, मंत्र्यांनी टाळ्या मिळवल्या, पण जमिनीवर मात्र गरिबांच्या घरांचे स्वप्न वाळूविना उघड्यावर पडले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केलेली '५ ब्रास मोफत वाळू' सिल्लोड तालुक्यात जणू मृगजळच ठरली आहे. गेल्या आठ महिन्यांपासून ९ हजार लाभार्थ्यांच्या याद्या कागदावरच सडत असून, पंचायत समिती ते तहसील कार्यालयापर्यंत केवळ 'लोटालोटी'चा खेळ सुरू आहे. गरिबांच्या घरांची राखरांगोळी करणाऱ्या या निर्दयी प्रशासकीय दिरंगाईमुळे आता 'घरकुल लाभार्थ्यांच्या आत्महत्या' सुरू होण्याची भीती निर्माण झाली असून, सरकारची प्रतिमा मलीन करणाऱ्या या अधिकाऱ्यांना अभय कुणाचे? असा जळजळीत सवाल विचारला जात आहे.

सिल्लोडमध्ये सध्या महसूल आणि गौण खनिज विभागाचा कारभार म्हणजे 'आंधळं दळतंय अन कुत्रं पीठ खातंय' असा झाला आहे. घरकुल मंजूर झाले,



हप्ते पडले, पण वाळूअभावी भिंती अर्धवट उभ्या आहेत. खनिकर्म विभागाकडे याद्या पाठवून आठ महिने उलटले, तरी अद्याप एकाही लाभार्थ्याला वाळूचा एक कणही मिळालेला नाही. अधिकारी मात्र "लिलाव होईल, साठा मिळेल, प्रस्ताव पाठवलाय" अशा वांझोट्या उत्तरांनी लाभार्थ्यांची बोळवण करत आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या कालावधीत तीन तहसीलदार बदलले, पण प्रश्न सुटला नाही. प्रत्येक नवा अधिकारी येतो, 'आठ दिवसात देतो' म्हणतो आणि बदली होईपर्यंत वेळ मारून नेतो. या प्रशासकीय तमाशात सामान्य माणूस मात्र भरडला जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, ही केवळ दिरंगाई नसून एक मोठा 'अर्थपूर्ण' सापळा आहे. गरिबांच्या मोफत वाळूचा मार्ग रोखून धरायचा आणि दुसरीकडे 'लक्ष्मीदर्शन' घेणाऱ्या वाळूमाफियांचे रस्ते मोकळे करायचे, असा हा प्रकार असल्याचे उघडपणे बोलले जात आहे. पोलीस, दलाल आणि काही भ्रष्ट कर्मचाऱ्यांच्या अभद्र युतीमुळे मंत्र्यांच्या आदेशालाही केराची टोपली दाखवली जात आहे. "आमचा रेट, आमची ताकद" अशा मस्तीत जगणाऱ्या तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीने शासनाच्या लोककल्याणकारी योजनांना सुरुंग लावला आहे.बावनकुळे साहेब, जर तुम्ही खरोखरच जागरूक असाल, तर या 'गेंड्याची कातडी' पांघरलेल्या अधिकाऱ्यांचे अहवाल मागवणे सोडा आणि थेट लाभार्थ्यांच्या हातात वाळूचे पास देण्याचे कडक आदेश निर्गमित करा. अन्यथा, घराचं स्वप्न पाहणाऱ्या या गरिबांचा तळतळाट तुमच्या पक्षाच्या आणि प्रशासनाच्या मुळावर आल्याशिवाय राहणार नाही. आता चेंडू मंत्र्यांच्या कोर्टात आहे—घोषणा अमलात येणार की फक्त कागदावरच राहणार?

# CFS नियमांचे उल्लंघन : पळस्पे फाटा ते उड्डाण पुलावर ट्रेलर ट्रकच्या रांगा, प्रवासी व ग्रामस्थांचे जीव धोक्यात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल /पळस्पे) :** पळस्पेफाटा ते शिरढोण गाव मार्गावरील कंटेनर फ्रेट स्टेशन (CFS) आणि लॉजिस्टिक यार्डमुळे होणाऱ्या बेकायदेशीर वाहतूक कोंडीमुळे हजारो प्रवासी व स्थानिक ग्रामस्थ गेल्या अनेक वर्षांपासून त्रस्त आहेत. दळणवळण, वाहतूक व व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या सुरक्षिततेच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे.

दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी JWC लॉजिस्टिक यार्डमध्ये जाणाऱ्या शेकडो ट्रेलर ट्रकांनी मुख्य रस्त्यापासून थेट उड्डाण पुलावर धोकादायक पद्धतीने पार्किंग केल्याचे निदर्शनास आले. या प्रकारामुळे वाहतुकीचा खोळंबा होऊन प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागला, तर स्थानिक ग्रामस्थांच्या सुरक्षिततेलाही मोठा धोका निर्माण झाला.CFS नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेजबाबदार लॉजिस्टिक यार्डमुळे दररोज



होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या गंभीर घटनेची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सदस्य साबीर शेख यांनी स्वतः दखल घेत लॉजिस्टिक पार्क विभागाशी संपर्क साधला. संबंधित ठिकाणी ट्रेलर चालकांना सूचना देत वाहतूक नियंत्रणाच्या दृष्टीने वाहतूक पोलीस व संबंधित CFS नियंत्रण विभागास हि माहिती देण्यात आली.

या प्रकारावर तातडीने अंकुश आणण्यासाठी व उपयोजना होण्यासाठी सूचना केल्या.वाहतूक पोलीस व CFS नियंत्रण विभागाने लॉजिस्टिक यार्डची पार्किंग क्षमता व नियमांची काटेकोर तपासणी करावी,वर्क ऑर्डर किंवा व्यावसायिक परवाने देताना कठोर अटी व शर्ती लागू कराव्यात,यार्डमध्ये पार्किंग, शौचालय, सांडपाणी व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत सुविधा नसल्यास संबंधित उद्योग परवाने कायमस्वरूपी रद्द करावेत,अशी ठोस मागणी वजा सूचना हि करण्यात आली आहे.यार्ड व्यवस्थापनाने या घटनेची तातडीने दखल घेतल्याचे दिसून आले असले, तरी भविष्यात उड्डाण पुलावर ओव्हरलोड व बेकायदेशीर ट्रक पार्किंगमुळे गंभीर अपघात होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासन कोणत्या ठोस उपाययोजना करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.

# ठाकरेबंधूंची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि मनसे युतीची घोषणा !

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( नासिकेत पानसरे ) :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख आणि मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी २४ डिसेंबर या दिवशी पत्रकार परिषद घेऊन मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युतीची ऐतिहासिक घोषणा केली. हीयुती मुंबईमहानगरपालिकेपुरती असून उर्वरित महाराष्ट्रातील अन्य महानगरपालिकांच्या निवडणुकींमध्ये युती असणार का, याविषयीचा निर्णय येत्या १-२ दिवसांत होईल, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. या वेळी खासदार संजय राऊत हेही व्यासपिठावर उपस्थित होते. १५ जानेवारी या दिवशी राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकी होणार असून १६ जानेवारी या दिवशी निकाल घोषित होणार आहे.एकत्र आलो आहोत, ते एकत्र रहाण्यासाठी. मुंबई आणि महाराष्ट्र यांवर कुणी वाकड्या दृष्टीने पहाणाऱ्यांना नष्ट केल्याविना रहाणार नाही. मराठी माणूस फुटला, तर नष्ट होईल, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

**मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि आमचाच होणार ! - राज ठाकरे**

कोणत्याही वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. या वाक्यापासून आम्ही एकत्र येण्याला प्रारंभ झाला. कोण किती जागा लढवणार, हे आता सांगणार नाही. मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि आमचाच होणार.असे राज ठाकरे म्हणाले.

**महाविकास आघाडीतून बाहेर !**

महाविकास आघाडीतील सहभागाविषयी पत्रकारांनी विचारले असता, महाविकास आघाडीतून सर्व पक्ष बाहेर पडून महाविकास अबाधित आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडातील सहभाविषयी उपरोधिक बोलले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासमवेत मनसे आल्यास काँग्रेसने स्वत:ची भूमिका आधीच घोषित केली आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासमवेत मनसे आल्यास त्यांना महाविकास आघाडीतून बाहेर पडावे लागेल, असे काँग्रेसच्या नेत्यांनी यापूर्वी म्हटले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# वाचन संस्कृतीला नवी दिशा देणारा जिल्हा ग्रंथालयाचा अभिनव उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्राम गृहाच्या पाठीमागे, सिव्हिल लाईन कडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुसज्ज जिल्हा ग्रंथालय आहे. जिल्हा ग्रंथालयात जवळपास ६० हजार पुस्तके उपलब्ध आहेत. (https://eg4.nic.in/OPAC/Default.aspx-?CL_NAME=DOLMH) या लिंकवर क्लिक केल्यास वाशिम जिल्हा निवड करून ग्रंथालयात असलेल्या पुस्तकाची यादी बघता येते. जिल्ह्यामध्ये वाचन संस्कृतीस चालना मिळावी यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे.वाचन संस्कृतीचा प्रसार, ज्ञानवृद्धी आणि समाजाच्या बौद्धिक विकासासाठी ग्रंथालये ही अत्यंत महत्त्वाची केंद्रे आहेत. बदलत्या काळात वाचकांच्या आवडी-निवडी, अभ्यासाच्या गरजा आणि ज्ञानाच्या क्षेत्रात होणारे नवनवीन बदल लक्षात घेऊन ग्रंथसंपदा अद्ययावत करता येते. या उद्देशाने वाचकांकडून त्यांच्या अवाडीच्या पुस्तकांना सुचविण्याचा नविन उपक्रम राबविण्यात येत आहे.जिल्हा ग्रंथालयामध्ये वरील यादिव्यतिरिक्त वाशिम जिल्ह्यातील रसिक वाचकांची आवडीची, उपयुक्त व प्रेरणादायी पुस्तके अजून जास्त संख्येने उपलब्ध करून देण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे. तरी या गूगल फॉर्मद्वारे जिल्ह्यातील साहित्यप्रेमी नागरिक, विद्यार्थी तसेच सर्व वयोगटातील वाचकांनी त्यांना अपेक्षित असणारी दर्जेदार पुस्तके सुचवावीत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. ज्या पुस्तकांसाठी जास्त वाचकांची पसंती असेल आणि शासकीय निकषानुसार शक्य असेल अशी जास्तीत जास्त नवीन पुस्तके उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

ग्रंथालयासाठी पुस्तक प्रस्तावासाठी (https://tinyurl.com/washimlibrary) या लिंक वर क्लिक करुन किंवा सोबत दिलेला QR Code स्कॅन करुन देखील पुस्तकाचे नाव नोंदविता येईल.हा गुगलफॉर्म ग्रंथालयासाठी वाचकांकडून पुस्तकांच्या सूचना / प्रस्ताव गोळा करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

# आदिवासी आधार मैत्री फाऊंडेशनने दिला एक मदतीचा हात

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : सुरगाणा तालुक्यातील कचुरपाडा पो.हस्ते या गावातील रहिवासी जेष्ठ नागरिक श्री. अर्जुन महादु जाधव वय - ८० यांच्या घराला दिनांक - ०८/१०/२०२५ रोजी दुपारी चहा करीत असताना अचानक गॅस सिलिंडरचा भडका होऊन घराला आग लागून त्यात घरातील धान्य, भांडे, कपडे, कागदपत्रे व इतर जीवनावश्यक वस्तुचे व घराचे अतोनात नुकसान झाले. आगीची बातमी कळताच गांवकरी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक यांनी आग आटोक्यात आणली व सुदैवाने जीवितहानी टळली. ते बाबा घरामध्ये एकटेच राहतात. त्यामुळे आजच्या घडीला त्यांना मदतीशिवाय पर्याय उरला नाही.



अशा संकटाच्या काळात गांवकरी, नातेवाईक व समाज बांधव मदतीला धाऊन आला. त्यात खारीचा वाटा आणि आपले कर्तव्य समजत आदिवासी आधार मैत्री फाऊंडेशन नाशिक जिल्हा व मित्र परिवार सुरगाणा, कळवण, दिंडोरी,पेठ,त्र्यंबकेश्वर यांनी मदतीचा हात पुढे करत, मी ज्या समाजात जन्माला आलो त्या समाजाचे काहीतरी देणं लागतो म्हणुन आपापल्या परीने सोशल मीडियाच्या माध्यमातून मदत करण्याचे आवाहन करण्यात आले होते .बऱ्याच बांधवांनी मदतनिधी जमा केली. आज महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी, काम करत असलेले सदस्य आपण ज्या समाजात, ज्या मातीत,ज्या गावात जन्माला आलो त्या मातीशी, समाज बांधवासी नाळ जुळलेली असते, त्यांचे दुःख हे आपले दुःख आहे असे समजून फाऊंडेशन च्या सदस्यांनी व मित्र परिवार यांनी आपल्या पगारातून आपल्या कष्टाचे पैसे वाचवून संकटात असलेल्या आपल्या समाज बांधवांसाठी आपण आनंद घेत असतांना त्यातला थोडासा आनंद, सुख,समाधान आपण त्या कुटुंबाला देऊ, त्यांच्या पदरात पडलेले दुःख आपण घेऊ व त्यांना चैतन्य, आनंद देऊ हेच आपल्या समाजाप्रती असलेले आपुलकीचे, प्रेमाचे नाते आपण निर्माण करु, म्हणून आदिवासी आधार मैत्री फाऊंडेशन सचिव बापू गारे यांच्या हस्ते पिडीत कुटुंबाला आदिवासी आधार मैत्री फाऊंडेशन व मित्र परिवार यांच्या कडून १८,६२२ रु.चा धनादेश दिला आणि ४४६० रुपयेचा सर्व किराणा देण्यात आला.तसेच वेल्स ऑन व्हील्स सामाजिक संस्था नाशिक जिल्हा व्यवस्थापक नारायण गभाले यांच्याकडून अर्जुन बाबांचा जीवन प्रवास गोड व्हावा म्हणून जीवनावश्यक वस्तूंचे किट देण्यात आले.

"एक हात मदतीचा" "लोक सहभागातून लोक हिताकडे" या ब्रीद वाक्याप्रमाणे मदत करण्याचा प्रयत्न केला. याप्रसंगी नामदेव पाडवी, सरपंच पांडुरंग गावीत तसेच फाऊंडेशन सदस्य व मित्र परिवार, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

# अलिबाग प्लास्टिकबंदी मोहिमेत १२ किलो जप्त, १२ हजारांचा दंड; जनावरांचे आरोग्य धोक्यात!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** प्लास्टिकच्या विटंबनामुळे समुद्रकिनारी रेवदंडा, नागाव, काशिदसह, मांडवा , किहीम, वरसोली अलिबाग तालुक्यातील गावांमध्ये पर्यावरणाचे आणि जनावरांचे आरोग्य धोक्यात सापडले आहे. अलिबाग नगरपरिषदेने सोमवारी (२३ डिसेंबर) वेगवेगळ्या दुकानांवर छापे टाकून १२ किलो प्लास्टिक जप्त करून १२ हजार रुपयांचा दंड वसूल केला. दूध उत्पादक, भाजीविक्रेते, हॉटेलदार, हार विक्रेत्यांसारख्या व्यावसायिकांना दणका देऊन जनतेला 'प्लास्टिक बंदीचा शपथ घ्या' असा संदेश दिला गेला.नगरपरिषदेचे



मुख्य कार्यकारी अधिकारी सागर साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक धनंजय आंब्रे, मुकादम प्रकाश तांबे, सुमित गायकवाड व आरोग्य विभागाचे कर्मचारी असलेल्या पथकाने शहरभर धाडी टाकल्या. प्लास्टिकमुळे माती, पाणी, हवा यांचा समतोल बिघडतोच; पण गायी-जनावरे, पक्षी यांना ते गिळून घातक आजार होतात. समुद्रकिनारी रेवदंडा, नागाव, काशिद भागात प्लास्टिक कचऱ्यामुळे मासेमारी आणि पर्यटन व्यवसायही धोक्यात आहे.

**"ग्रामपंचायतीने प्लास्टिक बंदी आणा!"**

अलिबाग नगरपरिषदेच्या या पावलाचे तालुक्यातील ग्रामपंचायतींनीही अनुसरण करावे, अशी मागणी जोर धरत आहे. पातळ प्लास्टिक जनावरांना आणि मानवी आरोग्यास घातक आहे; ते डंपिंग ग्राउंडमध्ये जळून निघणारा धूर प्रदूषण वाढवतो, ज्यामुळे श्वसनाचे आजार वाढत आहेत. सर्व ग्रामपंचायतीने एकत्र येऊन प्लास्टिक बंदी आणली, तर परिसर स्वच्छ होईल, पर्यावरण वाचेल आणि सर्व नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहील, अशी जनतेत जोरदार चर्चा होत आहे.

**"जनतेने घ्या जबाबदारी!"**

शहरातील नागरिक, शेतकरी व व्यापारी यांनी प्लास्टिकचा वापर थांबवून पर्यायी पिशव्या, कापडी बॅगा वापराव्यात. स्वच्छ समुद्रकिनारे, निरोगी जनावरे आणि प्रदूषणमुक्त पर्यावरणासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा. अन्यथा, भविष्यातील छाप्यांमध्ये दंड वाढेलच, पण आरोग्याचे मोठे नुकसान होईल!

**नगरपरिषदेतर्फे आवाहन :** "प्लास्टिक पिशवीचा वापर करू नका. पर्याय शोधा, पर्यावरण वाचवा!"

# घाटकोपर पश्चिम विधानसभा प्रभाग क्रमांक १२३ मधून बळीराज सेनेकडून सोनू शिवगण मुंबई महानगरपालिकेची निवडणूक लढवणार

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज) :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून,घाटकोपर पश्चिम विधानसभा प्रभाग क्रमांक १२३ मधून बळीराज सेनेचे पक्ष प्रमुख अशोक दादा वालम यांच्या आदेशाने बळीराज सेनेकडून सामाजिक कार्यकर्ते सोनू शिवगण हे मुंबई महानगरपालिकेची निवडणूक लढविणार आहेत.प्रभाग क्रमांक १२३ मध्ये जास्त कोकण वासिय कुणबी ओबीसी समाजाचे मतदार असून याचा फायदा नक्कीच बळीराज सेनेचे सोनु शिवगण यांना होताना



दिसणार आहे.त्यामुळे प्रभाग क्रमांक १२३ मधून बाकी इतर पक्षांच्या उमेदवारांना निवडणूक लढविताना सोनू शिवगण यांच्या कुणबी ओबीसी समाजाच्या उमेदवारीमुळे एक मोठ आव्हानच उभे राहणार आहे.या संपूर्ण प्रभागात कुणबी समाजाचे जवळपास नऊ ते दहा हजाराच्या आसपास कुणबी मतदार आहेत.आणि याआधीही या प्रभागात कुणबी समाजाच्या पाठबळावर काशिनाथ थारळी यांसारखे कुणबी नगरसेवक दिलेले आहेत.त्यामुळे नक्कीच सोनू शिवगण यांची उमेदवारी बाकी पक्षांच्या उमेदवारांना विचार करणारी असणार आहे. सोनू शिवगण यांचा चेहरा कुणबी समाजाच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक १२३ मधील सर्व कुणबी समाज बांधवांच्या घरोघरी परिचयाचा असून याचा फायदा नक्कीच त्यांना मुंबई महानगरपालिका निवडणूक लढविताना होताना दिसणार आहे.

# सत्तारांच्या बालेकिल्ल्याला भगदाड; 'खास' शिलेदार मच्छिंद्र पालोदकरांचा भाजपमध्ये 'धडाक्यात' प्रवेश!

## रावसाहेब दानवे यांच्या उपस्थितीत पालोदच्या उपसरपंचांनी हाती धरले 'कमळ

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** सिल्लोड च्या राजकारणात आज एकच खळबळ उडाली असून, माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांच्या सत्तेच्या गडाला मोठे भगदाड पडले आहे. सत्तारांचे अत्यंत विश्वासू आणि 'खास' शिलेदार म्हणून ओळखले जाणारे पालोदचे उपसरपंच मच्छिंद्र पालोदकर यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह शिवसेनेला (शिंदे गट) 'जय महाराष्ट्र' करत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या अनपेक्षित धक्क्यामुळे सत्तारांच्या बालेकिल्ल्याचे राजकीय गणित पार कोलमडले असून, आगामी निवडणुकीपूर्वीच विरोधकांनी सत्तारांच्या तटबंदीला सुरुंग लावल्याची चर्चा



तालुक्यात रंगली आहे.

माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेशाचा सोहळा पार पडला. यावेळी मच्छिंद्र पालोदकर यांच्यासह रहीमाबादचे योगेश शिंदे, सुभाष खेडकर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी हातावर 'कमळ' बांधले. सत्तारांच्या अत्यंत जवळचा माणूसच आता भाजपच्या गोटात सामील झाल्याने सिल्लोडच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाल्याचे मानले जात आहे.

**सत्तारांचे 'हात' रिकामे, विरोधक सुखावले!**

गेल्या अनेक वर्षांपासून सत्तारांच्या प्रत्येक निर्णयाला ताकद देणारे पालोदकर आता भाजपमध्ये गेल्याने सत्तारांची ताकद निम्म्यावर आल्याचे बोलले जात आहे. "विकास आणि सुशासनासाठी आम्ही हा निर्णय घेतला आहे," असे पालोदकर यांनी प्रवेशावेळी ठणकावून सांगितले. या पक्षप्रवेशामुळे पालोद, रहीमाबाद आणि अन्वी या भागांतील सत्तारांची पकड ढिली झाली असून, भाजपची ताकद मात्र कित्येक पटीने वाढली आहे.

मच्छिंद्र पालोदकर यांच्यासह संतोष सपकाळ, भाऊसाहेब जगताप, समाधान सपकाळ, साहेबराव सपकाळ, तुकाराम पालोदकर यांच्यासह तब्बल ५० हून अधिक प्रमुख कार्यकर्त्यांनी भाजपचा झेंडा खांद्यावर घेतला. या सोहळ्याला माजी आमदार सांडु पाटील लोखंडे, कमलेश कटारिया, आबासाहेब जंजाळ, एकनाथ हिवाळे, आत्माराम पाडाळे यांसह भाजपचे दिग्गज पदाधिकारी उपस्थित होते.या सामूहिक पक्षप्रवेशाने सिल्लोडमध्ये 'सत्तारशाही'ला मोठे आव्हान निर्माण झाले असून, आगामी काळात तालुक्यात मोठ्या राजकीय संघर्षाची ठिणगी पडण्याची चिन्हे आहेत.

# चिखलवर्धा ग्रामपंचायतीत पेसा दिन साधेपणात साजरा ; बिरसा मुंडा यांना अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी / महेश पेन्दोर :** घाटंजी तालुक्यातील चिखलवर्धा ग्रामपंचायत कार्यालयात पेसा दिन अत्यंत साध्या व शांत वातावरणात साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाचे जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

पेसा दिनानिमित्त भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी केलेल्या ऐतिहासिक संघर्षास उपस्थितांनी अभिवादन केले. त्यांच्या सामाजिक कार्यातून आदिवासी स्वशासनाची प्रेरणा मिळाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



या कार्यक्रमास ग्रामपंचायत पदाधिकारी, सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. पेसा कायदा म्हणजे पंचायती (अनुसूचित क्षेत्रातील विस्तार) अधिनियम, १९९६ असून या कायद्याद्वारे अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना स्वशासनाचा अधिकार देण्यात आला आहे. ग्रामसभा सक्षम करणे, स्थानिक नैसर्गिक संसाधनांवर आदिवासींचे हक्क कायम ठेवणे तसेच पारंपरिक रूढी-परंपरांचे संरक्षण करणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. पेसा दिनानिमित्त आयोजित हा कार्यक्रम कोणताही गाजावाजा न करता, सामाजिक जाणीव आणि आदिवासी हक्कांचे महत्त्व ठरला आहे.

# माणुसकीला काळिमा ! वृद्धेचा नैसर्गिक मृत्यू, पण दागिन्यांच्या हव्यासापोटी मृतदेह फेकला नाल्यात

## सिल्लोड ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई; आरोपी महिलेसह रिक्षा चालकाला अटक

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** येथील यशवंत नगर भागातील ६८ वर्षीय वृद्धेचा नैसर्गिक मृत्यू झाला असताना, केवळ त्यांच्या अंगावरील सोन्या-चांदीच्या दागिन्यांसाठी एका महिलेने त्यांचा मृतदेह रिक्षात टाकून नाल्यात फेकून दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी अवघ्या २४ तासांत या गुन्ह्याचा छडा लावत आरोपी महिलेला जेरबंद केले असून, १ लाख ७३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

चंद्रकलाबाई रामदास साळवे (वय ६८) असे मृत वृद्धेचे नाव आहे. २२ डिसेंबर रोजी पिंपळगाव पेठ जवळील एका नाल्यात त्यांचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आला होता. सुरुवातीला कोणताही मारहाणीचा खूण नसल्याने हा नैसर्गिक मृत्यू वाटत होता, मात्र पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली . तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे धक्कादायक वास्तव समोर आले.

पोलिस तपासात निष्पन्न झाले की , पिंप्री येथील अलका देविदास गाडेकर हिने चंद्रकलाबाईंना २१ डिसेंबर रोजी आपल्या घरी बोलावले होते. तिथेच त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचा मृत्यू झाला. मात्र, पोलिसांना कळवण्याऐवजी अलकाबाईने वृद्धेच्या अंगावरील सोन्याची पोत, चांदीचे कडे आणि पाटल्या असा सुमारे दीड लाखांचा ऐवज काढून घेतला. पुरावा नष्ट करण्यासाठी एका इसमाच्या मदतीने रात्रीच्या अंधारात रिक्षातून मृतदेह नेऊन नाल्यात फेकून दिला.

मृताचा मुलगा समाधान साळवे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून , आरोपी महिलेला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी चोरीचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली रिक्षा असा एकूण १ लाख ७३ हजारांचा माल हस्तगत केला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड , अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग , डीवायएसपी डॉ. दिनेशकुमार कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकरे व त्यांच्या पथकाने केली आहे.

# अंधश्रद्धांचा अंधार अजून कायम ; श्रीवर्धनसारख्या सुसंस्कृत शहरातही चिंताजनक प्रकार

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित :** जग विज्ञान-तंत्रज्ञानाच्या जोरावर चंद्रावर, मंगळावर झेप घेत असताना समाजातील काही घटक मात्र आजही अंधश्रद्धांच्या विळख्यात अडकलेले असल्याचे चित्र दिसून येत आहे. उतारे-करणी, जादूटोणा, टोळक्यांमार्फत उपचार अशा अंधश्रद्धा केवळ ग्रामीण भागापुरत्या मर्यादित न राहता श्रीवर्धनसारख्या सुसंस्कृत व शिक्षित शहरांमध्येही आढळून येत आहेत. अलीकडे घडलेल्या काही घटनांमधून ही बाब पुन्हा एकदा प्रकर्षाने समोर आली आहे.

राज्यभर अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदे, जनजागृती मोहीम, व्याख्याने आणि विविध उपक्रम राबवले जात असले तरी लोकांच्या मनातील भीती, गैरसमज आणि परंपरागत समजुती सहजासहजी दूर होत नसल्याचे वास्तव



आहे. आजारपण, आर्थिक अडचणी, कौटुंबिक वाद अशा प्रसंगी विज्ञानाधिष्ठित उपायांकडे न वळता काहीजण अजूनही अंधश्रद्धेचा आधार घेताना दिसतात. ही बाब केवळ व्यक्तीपुरती मर्यादित नसून समाजाच्या प्रगतीसाठी मोठा अडथळा ठरत आहे.

श्रीवर्धनमध्ये शिक्षणाची परंपरा, सामाजिक चळवळी आणि सांस्कृतिक वारसा असतानाही असे प्रकार घडणे ही गंभीर बाब मानली जात आहे. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम केवळ कागदावर किंवा एखाद्या कार्यक्रमापुरते न ठेवता स्थानिक पातळीवर अधिक व्यापक आणि सातत्यपूर्ण स्वरूपात राबवण्याची गरज अधोरेखित होत आहे. शाळा, महाविद्यालये, महिला बचतगट, युवक मंडळे आणि स्थानिक प्रशासन यांच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी ठोस प्रयत्न करणे आवश्यक आहे.

घडलेल्या घटनांमधून एकच गोष्ट स्पष्ट होते की, अंधश्रद्धा निर्मूलनाची लढाई अजून संपलेली नाही. समाजाला खऱ्या अर्थाने प्रगत आणि सुरक्षित करायचे असेल तर विवेक, विज्ञान आणि संविधानिक मूल्ये यांचा स्वीकार हाच एकमेव मार्ग आहे.

# तहसील कार्यालयातील एजंटगिरीवर थेट फौजदारी कारवाई करा” - आमदार सुरेश धस

## पाटोद्यातील आढावा बैठकीत काम चुकार अधिकाऱ्यांना घेतले फैलावर

## कंत्राटदारांचे लाड बंद करण्याच्या महावितरण अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा तालुक्यातील नागरिकांच्या प्रश्नांवर आता हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. तहसील कार्यालयात एजंटगिरी करणाऱ्यांवर थेट फौजदारी कारवाई करा, महावितरण व पंचायत समितीतील अधिकाऱ्यांचे लाड बंद करा आणि लोकांना तत्काळ सुविधा द्या, अशा स्पष्ट व कडक सूचना आमदार सुरेश धस यांनी पाटोदा तहसील कार्यालयात झालेल्या सर्व विभागांच्या आढावा बैठकीत दिल्या मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर रोजी पाटोदा तहसील कार्यालयाच्या सभागृहात आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय सर्व विभाग प्रमुखांची सविस्तर आढावा बैठक पार पडली. या बैठकीत महसूल, महावितरण, पंचायत समिती, शिक्षण, सार्वजनिक बांधकाम,




कृषी, जलसंपदा, आरोग्य, वन विभाग यांच्या सह इतर संबंधित विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेण्यात आला. डिजिटल के वाय सी, विविध शासकीय पोर्टल्समुळे नागरिकांची कामे प्रलंबित राहत असल्याबाबत आमदार सुरेश धस यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत तात्काळ सेवा देण्याचे स्पष्ट आदेश दिले. तहसील कार्यालयात एजंटगिरी वाढल्याच्या तक्रारी गंभीर असल्याने अशा व्यक्तींवर थेट फौजदारी कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. महावितरण विभागाच्या बाबतीत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर अर्ज करून ही सौर पंपांचे वितरण न झाल्याबाबत अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. कमी विद्युत दाब, ट्रान्सफॉर्मर अभाव, नवीन कनेक्शनमध्ये दिरंगाई या तक्रारी तात्काळ सोडवण्याचे आदेश देत “लोकांना सुविधा द्या, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे लाड बंद करा,” असा स्पष्ट इशारा दिला. महसूल विभागासंदर्भात सप्टेंबरमधील अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेऊन पात्र शेतकरी व नागरिकांना मदत वेळेत मिळाली आहे का, याची तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शेत रस्ते, वस्ती रस्ते, हद्द कायम करणे, भूसंपादन व मावेजा प्रकरणातील प्रलंबित कामांवर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश ही दिले.

संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, एकल महिला योजना यांचे अनुदान आधार व के वाय सी मुळे रखडल्याबाबत जिल्हाधिकारी मार्फत शासनाकडे अहवाल पाठवून तातडीने निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश आमदार सुरेश धस यांनी दिले. शिक्षण विभागाबाबत शाळांमधील शिक्षक अनुपस्थिती व शैक्षणिक वातावरण बिघडवणाऱ्या घटनांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच शहरातील शाळा-कॉलेज व खासगी क्लासेसमध्ये शिकणाऱ्या किशोरवयीन मुलींना होणाऱ्या त्रासाच्या तक्रारींवर गांभीर्याने दखल घेऊन संरक्षणासाठी समिती स्थापन करून ठोस कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

जन्म-मृत्यू नोंदणीसाठी जादा कागदपत्रांच्या अडचणींबाबत वकील संघटनेशी चर्चा करून स्वतंत्र बैठक घेऊन मार्ग काढण्याच्या सूचना देण्यात आल्या. कृषी विभागाला डीबीटी योजनांचा लाभ विलंब न होता देण्याचे, तर जलसंपदा व जलसंधारण विभागाकडील प्रकल्पांतील पाणीसाठ्याची माहिती नियमित अद्ययावत ठेवण्याचे आदेश देण्यात आले. या बैठकीला उपविभागीय अधिकारी श्रीमती वसिमा शेख, तहसीलदार दत्तात्रय निलावाड, महावितरणचे कार्यकारी अभियंता डोंगरे, सार्वजनिक बांधकाम विभाग आष्टीचे कार्यकारी अभियंता पानसंबळ, नगराध्यक्ष राजेंद्र जाधव, मुख्याधिकारी जोशी, पोलिस निरीक्षक घोळवे, वन परीक्षेत्र अधिकारी काकडे व घोडके, गटविकास अधिकारी सानप, कृषी अधिकारी शेळके, गटशिक्षणाधिकारी बोदार्डे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी बेल्हेकर यांच्या सह सर्व विभागांचे उप अभियंते, कनिष्ठ अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकूणच या आढावा बैठकीत आमदार सुरेश धस यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत जबाबदारीची जाणीव करून देत, “काम करा, अन्यथा कारवाईला सामोरे जा,” असा ठाम संदेश दिला.

---

# सणसरच्या कन्येने गावाचे नाव गाजवले राष्ट्रीय पातळीवर

## कु रुद्रानीराजे निंबाळकर हिचा मध्यप्रदेश मध्ये डंका

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर गावाची कन्या हिने मध्यप्रदेश मधील सागर या ठिकाणी दि.17 डिसेंबर ते 21डिसेंबर या कालावधीमध्ये 69 वी नॅशनल शालेय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये महाराष्ट्रासहित 36 राज्याने (राज्य+केंद्रशासित प्रदेश ) सहभाग घेतला होता. जवळपास 400 खेळाडू ह्या स्पर्धेमध्ये सामील झाले होते.यामध्ये 14 वर्षे वयोगटाखालील महाराष्ट्राच्या टीमने राष्ट्रीय चॅम्पियन चा किताब आपल्या




नावावर केला.या स्पर्धेमध्ये तामिळनाडूचा संघ उपविजेता ठरला.अंतिम सामन्यांमध्ये महाराष्ट्र संघाने तामिळनाडू संघावर 2-1 असा विजय प्राप्त केला.

विजेत्या महाराष्ट्र संघामध्ये आपल्या सणसरची कन्या कु रुद्राणीराजे संग्रामसिंह निंबाळकर हिने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत होती.तिच्या सातत्य आणि खेळ भावना या जोरावर कु रुद्राणीराजे हिने सणसर गावाचे व स्वतःचे नाव राष्ट्रीय पातळीवर गाजवल आहे.कु रुद्रानीराजे निंबाळकर ही इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संग्रामसिंह निंबाळकर यांची कन्या असून प्रगतशील बागायतदार दत्तात्रय आप्पा निंबाळकर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजितदादा गटाचे पुणे जिल्हा नेते मुरलीधर काका निंबाळकर व पै पांडुरंग भाऊ निंबाळकर यांची नात आहे.

---

# विकास महाविद्यालयात ग्राहक जागरुकता व प्रबोधन कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** विक्रोळी कन्नमवार नगरातील विद्या विकास एज्युकेशन सोसायटी संचालित विकास कॉलेज ऑफ आर्ट्स सायन्स येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष ( IQAC ) व व्यवस्थापन अभ्यास विभाग आणि ग्राहक पंचायत महाराष्ट्र मुंबई उपनगर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राहक जागरुकता व प्रबोधन कार्यक्रम २३ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता संपन्न झाला.प्रारंभी महाविद्यालयाचे (ग्रंथपाल व समन्वयक आयक्यूएसी)उदय कुलकर्णी

यांनी ग्राहक पंचायत महाराष्ट्र मुंबई उपनगर शाखेच्या सदस्यांची ओळख करुन दिली.ग्राहक हक्क,जबाबदाऱ्या,तक्रार निवारण,प्रक्रिया तसेच ग्राहक संरक्षण कायद्याबाबत विद्यार्थ्यांना जागरूकता निर्माण करणे हा कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता.कार्यक्रमात शाखेच्या सदस्या व समाजसेविका जयश्रीदिदी खिलारी व संजय येलवे यांनी तुम्ही विद्यार्थी प्रथम ग्राहक आहात हे पटवून दिले. या प्रसंगी ग्राहक पंचायत महाराष्ट्र मुंबई उपनगर शाखेचे सदस्य,ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे,दिनेश बेरीशेट्टी, राजाराम राव,सहिष्णुता कांबळे,आदि मान्यवर उपस्थित होते. जयश्रीदिदी म्हणाल्या, नॉलेज मध्ये पॉवर आहे. त्यांनी हिंमत येते.छोट्या छोट्या प्रसंगातून त्यांनी ग्राहकांचे हक्क संमजावून



सांगितले.एकदा सिंधुदुर्ग मधील एका नवरदेवाला कपडे वेळेत नाही मिळाले तेव्हा त्यानी ग्राहक पंचायत कडे तक्रार केली.तेव्हा त्यास फसवणूक,मनस्ताप दिल्याबद्दल नुकसान भरपाई व दंड द्यावा लागला.आपण कुठलेही खरेदी केली तर त्याची पावती घेणे आवश्यक आहे.याकडे जयश्रीदिदी यांनी लक्ष्य वेधले.एका महिलेने पेट्रोलपंपावर लेडीज टॉयलेट उघडून देण्यास सांगितले. पण त्यास नकार मिळताच तिने ग्राहक पंचायत कडे तक्रार केली.तेव्हा त्यास दिड लाखाचा दंड ठोठावण्यात आला.मेडीकल स्टोअर मध्ये गेलात तर छोटी रक्कम असेल तरीही त्याची पावती घेणे जरुरीची आहे.औषधे घेताना त्याची मुदत चेक करणे,कुठलीही वस्तू घेताना त्याच्या एमआरपी पेक्षा जास्त किंमत देऊ नये.असे त्यांनी ठणकावून सांगितले. प्रास्ताविकात संजय येलवे यांनी ग्राहक पंचायत महाराष्ट्र मुंबई उपनगर शाखेची माहिती दिली.आपण सुशिक्षित झाले पाहिजे.हक्कासाठी लढले पाहिजे तरच आपण न्याय मागू शकतो.असे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. रेश्मा अन्वेकर ( समन्वयक व्यवस्थापन अभ्यास विभाग ),ग्रंथपाल व समन्वयक उदय कुलकर्णी उदय कुलकर्णी,संस्थेचे संचालक डॉ.विनय राऊत,प्राचार्य श्रीमती सी.विन्स यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.महाविद्यालयाच्या वतीने प्रा. जयंत नाईक तर ग्राहक पंचायत शाखेच्या वतीने दिनेश बेरीशेट्टी यांनी आभार मानले.राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या पाश्र्वभूमीवर आयोजित उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना ग्राहक म्हणून आपले अधिकार व कर्तव्य समजून घेण्याची संधी मिळाली.

---

# तळणी येथे नाफेड खरेदी केंद्राचा शुभारंभ ; शेतकऱ्यांना हमीभावाचा दिलासा

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र/राजू शिंदे. :** मंठा तालुक्यातील तळणी येथे नाफेड खरेदी केंद्राचा शुभारंभ परतूर- मंठा मतदारसंघाचे आमदार तथा माजीमंत्री बबनराव लोणीकर यांच्या हस्ते बुधवारी (ता. २४) दुपारी १ वाजता करण्यात आला. या खरेदी केंद्रामुळे परिसरातील शेतकऱ्यांना हमीभावाचा मोठा दिलासा मिळणार आहे.

या केंद्रामार्फत शेतकऱ्यांना सोयाबीनसाठी ५,३२८ रुपये, उडिदसाठी ७,८०० रुपये, तर मुगासाठी ८,७२८ रुपये प्रति क्विंटल असा शासननिर्धारित हमीभाव मिळणार आहे. नाफेडच्या माध्यमातून शेतमालाची थेट खरेदी केली जाणार असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक अडचण कमी होण्यास मदत होणार आहे.

उद्घाटनप्रसंगी बोलताना आ. लोणीकर म्हणाले की, शेतकऱ्यांचा शेतीमाल थेट केंद्र सरकारमार्फत हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय असला, तरी अनेक ठिकाणी खरेदी केंद्रे वेळेत सुरू न झाल्याने शेतकऱ्यांना मिळेल त्या भावाने शेतीमाल विकावा लागत होता. यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लूट होत असल्याचे चित्र निर्माण झाले होते.

शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेता नाफेड खरेदी केंद्र तातडीने सुरू करणे गरजेचे होते. यासाठी सरकारमध्ये असतानाही आपण थेट हिवाळी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित केला.



त्याचा परिणाम म्हणून जिल्ह्यासाठी १२ खरेदी केंद्रास मंजुरी मिळाली आणि आज हे केंद्र प्रत्यक्षात कार्यान्वित झाले, असे लोणीकर यांनी सांगितले.यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे भाऊसाहेब गोरे, भाजपचे तालुकाध्यक्ष नितीन राठोड, गणेश खवणे, राजेश मोरे, पंजाब बोराडे, अजय अवचार, विठ्ठल काळे, शरद पाटील, ज्ञानेश्वर सरकटे, सुरेश सरोदे, अमोल मोरे, दिपक दवणे, सरपंच गौतम सदावर्ते, डॉ. दत्ता काकडे, विश्वनाथसिंग चंदेल, गणेशराव कापकर, भगवान देशमुख, राजेश खंदारे, कृष्णा खंदारे, किशोर हनवते यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सहदेव मोरे यांनी केले.

प्रास्ताविक नितीन सरकटे, तर आभार प्रदर्शन संतोष खंदारे यांनी केले.दरम्यान, राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत मौजे देवठाणा-उस्वद ता. मंठा येथे आरोग्य उपकेंद्राच्या मुख्य इमारतीच्या ५८.२७ लाखांच्या बांधकामाचे भूमिपूजन आ. बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच विष्णु मोरे , रामेश्वर देशमुख, गुलाब राठोड, पप्पू मोरे आदी ...

---

# श्री छत्रपती कारखान्याकडून बाजारपेठेतील गाळाभाडे वाढ ; भासदाकडून चेअरमन व सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** श्री छत्रपति सहकारी साखर कारखाना लि.,भवानीनगर ता.इंदापूर यांच्या मालकीचे असणारे बाजारपेठेतील गाळा भाडेवाढ दि 01/01/2026 पासून अमलात आणणार असल्याची माहिती पत्रक काढुन देण्यात आली आहे.

कारखाना कार्यस्थळावरील सर्व व्यापारी/व्यावसायिक बंधुना कारखान्याचे बाजारपेठेतील भाडेतत्वावर दिलेल्या व्यापारी गाळे, मोकळी जागा (पत्रा शेड) वापराचे भाडे दराबाबत मा. संचालक मंडळ सभा दिनांक



२७/११/२०२५ ठराव क्र.१२ (अ) नुसार विचार विनिमय होऊन दिनांक १/०१/२०२६ पासून खालीलप्रमाणे भाडे आकारणी करणेस व त्याप्रमाणे अंमलबजावणी करणेस मंजुरी देण्यात आली असल्याचे पत्रक बाजारपेठेतील व्यापारी यांना देण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली.

मा. पृथ्वीराज बापू जाचक यांनी गाळा भाडेवाढीचा निर्णय हा कारखान्याच्या हिताचा असून कारखाना केलेली भाडेवाढ योग्य असून कारखान मालकीचा असणारे गाळे परस्पर विक्री होत आहे त्यावर सुद्धा आळा बसला पाहिजेत अशी मागणी सभासद करत आहेत. परिसरातील ऊस उत्पादक सभासद यांनी या निर्णयाचे जोरदार स्वागत करून आनंदाचे वातावरण तयार झाले असल्याची प्रतिक्रिया सभासदामध्ये दिसून येत आहे.

---

# कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कै रमेश खलीपे कनिष्ठ महाविद्यालयात होणार ५३ वे विज्ञान प्रदर्शन

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर) :** रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कै रमेश खलीपे कनिष्ठ महाविद्यालय पिलीव या ठिकाणी पंचायत समिती माळशिरस शिक्षण विभाग यांच्या विद्यमाने प्राचार्य अशोक बागल यांच्या मार्गदर्शनाखाली ५३ वे विज्ञान प्रदर्शन केलेले आहे. हे शासकीय विज्ञान प्रदर्शन दि २६ व २७ डिसेंबर २०२५ रोजी पिलीव या ठिकाणी होत असल्याने पिलीव बरोबरच आसपासच्या




खेड्यापाड्यातही शैक्षणिक दृष्टीने आणि या स्पर्धात्मकदृष्ट्या अलभ्य लाभ होणार आहे. यासाठी पंचायत समिती माळशिरस, शिक्षण विभाग आणि तालुक्यातील इतर शिक्षण संस्था त्याचप्रमाणे जिल्हा परिषद शाळा त्याचप्रमाणे सर्व शिक्षक वृंद आणि प्राचार्य बागल आणि त्यांचा सर्व कर्तव्यदक्ष स्टाफ मोठ्या कौतुकाने तयारीस लागल्याची माहिती मिळत आहे. तसेच सर्व ग्रामस्थांनाही या विज्ञान प्रदर्शनाच्या कार्यक्रमाचे वेध लागल्याचे दिसून येत आहे. तरी या विज्ञान प्रदर्शनाच्या कार्यक्रमाचे प्रत्यक्ष दर्शनी सर्वांनी उपस्थित राहून विद्यार्थी विद्यार्थिनींचे कौतुक करून आधुनिक ज्ञानाचा लाभ घेण्याबाबतचे आवाहन पंचायत समिती शिक्षण विभाग माळशिरस आणि प्राचार्य अशोक बागल यांनी आवाहन केले आहे.

---

# शिळवणी ग्रामपंचायत कार्यालयाकडून विकास कामाला सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/ महादेव उप्पे :** देगलूर तालुक्यातील मौजे शिळवणी येथे जनतेच्या हितार्थ विविध विकास कामे करण्यात आली असून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत विविध गावच्या हितार्थ कामे केली जात असून मौजे शिळवणी येथील ग्रामपंचायत सरपंच श्रीमती शोभाबाई गुलाबराव देशमुख व ग्रामविकास अधिकारी गजानन बेंडे,मा.जि.प.उपाध्यक्ष रमेशराव देशमुख,यांच्या मार्गदर्शनाखाली गावात ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आले आहे व ग्रामपंचायतीच्या वतीने अंगणवाडी येथील बालकांना खेळण्याचे साहित्य,वजन काटे, बसण्याकरता चटई,घसरगुंडी इत्यादी साहित्य उपलब्ध करून दिले आहेत. तसेच आरोग्य उपकेंद्रातही बीपी तपासणीचे मशीन,व इतर आरोग्य विषयक वैद्यकीय साहित्य उपलब्ध करून दिले असल्याने गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.यावेळी गावकऱ्यांना पिण्याकरिता आर ओ शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले आहे तसेच आरोग्य केंद्राला डॉपलर मशीन,जि.प. शाळेला टेबल,प्लास्टिक खुर्च्या, ग्रामपंचायत कार्यालयात कॅम्पुटर,प्रिंटर,व ग्रामपंचायत वायफाय केली आहे.

आगामी काळात आवश्यक ठिकाणी ठिकाणी पथ दिवे व सौर ऊर्जा पथ दिवे लावले जाणार असून जि.प.शाळेतील मुलांमुलीना वेगवेगळे शौचालय केले जाणार आहेत.यावेळी सरपंच श्रीमती शोभाबाई गुलाबराव देशमुख यांनी येत्या काळात गावात येणाऱ्या रस्त्यावर दुतर्फा झाडे व गावातील स्वच्छतेला,आश्रम येथील विकास कामे करण्यासाठी विशेष महत्त्व देणार असल्याचे मानस यावेळी व्यक्त केल्या आहेत. यावेळी सर्व आशा वर्कर,अंगणवाडी सेविका,ग्रा.प. सदस्य मंगेश वंजे,शिवाजी देवकत्ते,नितेश सुर्यवंशी,मा. उपसरपंच अनिल राठोड,अॅड. महेश देशमुख,नागेंद्र वंजे,बालाजी घोडेकर, सदाशिव सूर्यवंशी,सचिन दोमाटे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# राष्ट्रीय समाज पक्ष व काँग्रेस महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणूका एकत्र लढणार

## रासपचे अध्यक्ष महादेव जानकर व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** :राज्यातील नगरपालिका निवडणुकीनंतर होत असलेल्या महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांसाठी काँग्रेस पक्ष सज्ज असून नगरपालिका निवडणुकाप्रमाणेच या निवडणुकीतही समविचारी पक्षांना सोबत घेण्याची काँग्रेसची भूमिका आहे. महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेस व राष्ट्रीय समाज पक्ष एकत्र लढणार असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर केले.

टिळक भवन येथे आज राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यात आज आघाडीबाबत सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी पत्रकार



परिषदेत आघाडीची घोषणा केली. यावेळी पत्रकारांशी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, महादेव जानकर हे बहुजन समाजाचा आश्वासक आवाज आहेत. देशात लोकशाही व संविधान पायदळी तुडवण्याचे काम भारतीय जनता पक्ष करत आहे अशा प्रसंगी समविचारी पक्षांनी एकत्र येऊन लढण्याचा निर्णय झाला आहे. नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीत आघाडीची औपचारिक घोषणा केलेली नव्हती पण सातारा, सांगली तसेच मराठवाडा व विदर्भात एकत्र निवडणुका लढलो आहोत आणि तीच भूमिका आज पुढे घेऊन जात आगामी काळात सोबत राहण्याचा निर्णय झाला आहे.

राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यावेळी म्हणाले की, शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार घेऊन काम करत असताना समविचारी पक्षांनी एकत्र असावे या भावनेतून लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची दिल्लीत भेट घेतली होती. काँग्रेसबरोबर रासपची आघाडी ३१ मे रोजीच झाली आहे. राहुल गांधी हे देशातील तरुण, महिला, आदिवासी, गोरगरीब, मागासवर्गीय यांचा आवाज बनून काम करत आहेत. जागा किती मिळणार यापेक्षा आजघडीला संविधान व लोकशाही वाचवण्याची नितांत गरज आहे तसेच सामान्य लोकांना मान सन्मान मिळाला पाहिजे, असे जानकर म्हणाले..

**शिवसेना मनसे युतीला शुभेच्छा**

राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांच्या युतीबद्दल विचारले असता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, त्यांच्या युतीला आमच्या सदिच्छा व शुभेच्छा आहेत, आम्ही जोडणारे आहोत तोडणारे नाही. विधानसभा व लोकसभा निवडणुकीत मविआ एकत्र लढली पण मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका स्वबळावर लढवाव्यात अशा कार्यकर्त्यांच्या भावना आहेत, त्यानुसार पक्षाने निर्णय घेतला आणि प्रभारी रमेश चेन्नीथला यांनीही पक्षाची भूमिका जाहीर केलेली आहे.

# बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार विरोधात मुंबईत मराठा महासंघाचा निषेध

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी** : बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदू समाजावर सुरू असलेल्या अमानुष अत्याचारांच्या निषेधार्थ मुंबई उपनगर जिल्हात अखिल भारतीय मराठा महासंघ आणि क्षत्रिय मराठा सेवा संस्था, हिंदू समाज बांधवांच्या वतीने तीव्र संत व्यक्त करण्यात आला. या अत्याचारांचा निषेधासाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हा यांना तसेच निर्मलनगर पोलिस ठाणे खार पुर्व मुंबई यांना अधिकृत निवेदन सादर करण्यात आले.

सन १९७१ मध्ये भारताने भारताने बांग्लादेशाला पाकिस्तानातल्या जुलमी राजवटीतून मुक्त करून स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्यास मोलाची भुमिका बजावली होती. मात्र आज त्याच बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदू समाजावर सातत्याने अन्याय, हिचाचार व धार्मिक छळ होत असल्याचे चित्र समोर येत आहे. हिंदूची घरे जाळली जात असून, धार्मिक स्थळांची तोडफोड केली जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वी दिपू चंद्र दास या निष्पाप हिंदू नागरिकांला रस्त्यावर फरफटत नेत झाडाला उलटे



टांगून अमानूष मारहाण करून जाळून ठार मारल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण हिंदू समाजात संतापाची तीव्र लाट उसळली आहे.

या पार्श्वभूमीवर हिंदू समाज बांधवांनी एकत्र येत या अमानवी कृत्याचा निषेध केला. निवेदनाद्वारे भारत सरकारने व परराष्ट्र मंत्रालयाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करावा, बांगलादेश सरकारवर दबाव आणून तेथील हिंदूंना संरक्षण मिळावे, तसेच दोशींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी उपस्थित शांततेच्या मार्गाने निषेध नोंदवून "हिंदू समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आम्ही गप्पा बसणार नाही" असा इशारा दिला. भविष्यात या विषयावर आवाज उठवत राहण्याचा निर्धार समाज बांधवांनी व्यक्त केला.

# विद्यार्थ्यांना प्रभावी अध्यापन करणाऱ्या शिक्षिका ; श्रीमती मंगल शेंदुरकर–शिंदे यांचा सेवापूर्ती समारंभ

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी** : शिक्षण क्षेत्रात कार्यरत असताना सुसंस्कृत, संस्कारक्षम आणि समाजाचा आधारस्तंभ ठरणारे विद्यार्थी घडवणे हेच प्रत्येक शिक्षकाचे ध्येय असते. हेच ध्येय डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थीप्रिय शिक्षिका श्रीमती मंगल शेंदुरकर–शिंदे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले.

दि. २७ डिसेंबर २०२५ (शनिवार) रोजी वयाच्या ५८ व्या वर्षी त्यांनी शिक्षण क्षेत्रातील ३५ वर्षांची यशस्वी सेवा पूर्ण करून सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यांच्या या सेवापूर्तीच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा थोडक्यात घेतलेला हा दृष्टिक्षेप...

श्रीमती शेंदुरकर–शिंदे यांची प्रथम नेमणूक दि. २५ जुलै १९९१ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टाकळसिंग (ता. आष्टी) येथे झाली. त्यानंतर त्यांनी शिक्षण क्षेत्रात अत्यंत निष्ठेने आणि समर्पणाने कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांच्या सेवाकाळातील मोठा कालावधी केंद्रीय प्राथमिक शाळा, आष्टी नं. १ येथे गेला. आष्टी शहरात सेवा करत असताना त्यांनी असंख्य विद्यार्थी घडवले. आज त्यांचे विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, समाजसेवक, उद्योजक म्हणून विविध क्षेत्रात कार्यरत असून आजही विद्यार्थ्यांच्या मनात त्यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते.

शहरी भागाबरोबरच क-हेवडगाव, शिरूर कासार, तसेच सध्या कार्यरत पांगुळगव्हाण अशा ग्रामीण भागातही त्यांनी प्राथमिक शिक्षिका म्हणून उत्कृष्ट सेवा बजावली.

त्या आष्टी तालुक्यातील कडा गावचे माजी केंद्रप्रमुख श्री. चंद्रकांत शिंदे सर यांच्या पत्नी असून, पती-पत्नी दोघांनीही आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण क्षेत्राला वाहून घेतले. गुणवत्ता विकास अभियान (VRAMANI पॅटर्न) अंतर्गत त्यांच्या वर्गाचा ९१% पेक्षा अधिक गुणवत्ता निकाल लागला होता. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या वतीने त्यांना 'आदर्श शिक्षिका पुरस्कार' प्रदान करण्यात आला होता.

कौटुंबिक पातळीवरही त्यांनी संस्कारांची परंपरा जपली. त्यांचे पुत्र श्री. प्रशांत शिंदे व श्री. सागर शिंदे हे दोघेही उच्चशिक्षित इंजिनिअर असून पुणे येथे कार्यरत आहेत. त्यांच्या दोन्ही सुनबाई श्रीमती तेजश्री व श्रीमती अश्विनी ह्याही इंजिनिअर आहेत.

त्या राष्ट्रीय खेळाडू पैलवान श्री.



बाळासाहेब शेंदुरकर व तलाठी श्री. इंद्रकांत शेंदुरकर यांच्या ज्येष्ठ भगिनी होत. शिक्षणाचा खरा वसा त्यांना स्वातंत्र्यसैनिक स्व. हरिचंद्र शेंदुरकर यांच्याकडून मिळाला. आई सुभद्राबाई यांच्या सहकार्याने मुलीच्या शिक्षणासाठी धाडसाने पावले उचलणाऱ्या या कुटुंबातूनच त्यांच्या जिद्दीचा पाया घातला गेला.

त्यांचे मूळ जन्मगाव कुंभेफळ असून, प्राथमिक शिक्षण धानोरा–कुंभेफळ येथे तर माध्यमिक शिक्षण लोकमान्य विद्यालय, खुंटेफळ येथे झाले. दहावीच्या वर्गात त्या एकमेव विद्यार्थिनी होत्या. प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी महिला अध्यापक विद्यालय, बीड (आदर्श शिक्षण संस्था) येथे डी.एड.चे शिक्षण पूर्ण केले.

सेवाकाळात त्यांना श्रीमती कांता काकडे मॅडम, श्रीमती आशा आडकर, श्रीमती आशा गाडे, श्रीमती जुलेखा शेख, श्रीमती शशिकला बांदल, श्रीमती छाया कर्डिले या मैत्रिणींचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच लोकमान्य विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. मोहनराव शिंदे सर, श्री. शांतीलाल गुरसाळे सर, श्री. पवार सर, श्री. शेख सर, स्व. विधाते सर, स्व. रसाळ सर व स्व. दाभाडे सर यांचे मार्गदर्शन त्यांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे ठरले.

नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारून जुन्या–नव्या पिढीतील अनुभवाच्या जोरावर त्यांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले. उत्तम गृहिणी, विद्यार्थीप्रिय शिक्षिका व मार्गदर्शिका म्हणून त्यांची कामगिरी कायम स्मरणात राहणारी आहे.

सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी शुभेच्छा देताना एवढेच म्हणावेसे वाटते—"तुमचे शैक्षणिक कार्यातील समर्पण खरोखरच प्रेरणादायी आहे. सेवानिवृत्ती म्हणजे करिअरचा शेवट नसूनजीवनातील एका नव्या अध्यायाची सुरुवात आहे.तुमच्या पुढील आयुष्यात आनंद, आरोग्य व समृद्धी नांदो."

# पंढरीनाथ भालेकर यांची पुस्तके झाली प्रकाशित

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** ज्येष्ठ साहित्यक समीक्षक पंढरीनाथ भालेकर यांच्या स्पदंने अतंरीची हा वेदांत प्रकाशनचा कविता संग्रह आणि रंग हा समग्र प्रकाशनचा कथासंग्रह यांचे प्रकाशन कल्याण येथील सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात झाले. ग्रंथ प्रकाशन श्रीमती चंद्रभागा लक्ष्मण सुतार या भालेकर यांच्या अशिक्षित पण आधारवड असलेल्या भगिनीच्या हस्ते करण्यात आले. श्रीमती चंद्रभागा सुतार यांनी पंढरीनाथ कसा स्वप्न पहाणारा आणि सत्यात उतरवणारा आहे हे सांगून पंढरीनाथ यांचे अभिनंदन केले, शुभेच्छा आणि आशीर्वाद दिले. त्यांच्या लहान बहिणीनेही या प्रसंगी आपल्या भावना व्यक्त केल्या.सदर प्रकाशन सोहळयास कवी कथाकार सुधीर शेरे अध्यक्ष म्हणून तर चित्रपट गीतकार कवी अन्वर मिर्झा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. वेदांत प्रकाशनचे प्रा. विनायक आभाळेसर यांनी स्पंदने अंतरीची या कवितासंग्रहाची निर्मितीप्रक्रिया विषद केली तर समग्र प्रकाशनचे दास पाटील यांनी रंग चे अंतरंग उलगडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवी बाळकृष्ण पाटील यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना अन्वर मिर्झा यांनी भालेकर यांच्या लेखक कवी म्हणून च्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात कवी सुधीर शेरे यांनी स्पंदने अंतरीची हा कविता संग्रह गझल संग्रह म्हणून कसा उत्कृष्ट आहे, आणि रंग हा कथा संग्रह कसा वाचकांच्या भावभावना गडद करणारा कथासंग्रह आहे यावर आपले विचार मांडून भालेकर यांचे अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा दिल्या. आरंभी गीतगायन तदनंतर दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. भालेकर यांचे सुहृद प्रकाश भोसले सर यांनी भालेकर पंढरीनाथ आहेत म्हणून हा वारकरी मेळा भरला आहे एकीकडे बहिण चंद्रभागा आणि पत्नी चंद्रप्रभा यांच्या सानिध्यात पंढरीनाथाची साहित्य पंढरी फुलली आहे असे प्रतिपादन करुन साहित्यकृतींचं कौतुक केलं आणि भालेकर यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.ॲड. अशोक लोखंडे यांनी भालेकर यांच्या मैत्रीभावाचा प्रवास वर्णन केला. नवांकुर प्रतिष्ठान, कल्याण या संस्थेने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. नवांकुरच्या आठवणींना चेतन चौधरी यांनी ऊजाळा दिला.नवांकुर प्रतिष्ठान मार्फत शाल,भेटवस्तू आणि पुष्पगुछ देवून मान्यवरांचा सन्मान केला.ॲड. गणेश कोळी यांनी भालेकर सर यांच्या मुळे आपण कसे वकील आणि लेखक व इंग्रजीत पारंगत कसे झालो ते सांगितले. लेखक भालेकर यांनी आपण आनंदासाठी लिहित आहोत आणि लिहित राहू असे सांगतानाच आपल्या साहित्यिक आपत्यांच्या जन्मकथा सांगून उपस्थित मान्यवरांना धन्यवाद दिले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन मारुती शेरकर आणि अपूर्वा भालेकर - खरे यांनी स्पंदन अंतरीचे यातील कवितांची पेरणी करत रंग मधील कथांचे किस्से सांगत छान उंचावत नेले. पंढरीनाथ भालेकर आणि सौ.चंद्रप्रभा भालेकर यांच्या चाळीसाव्या लग्न वाढदिवसाचे औचित्य साधून प्रकाशन कार्यक्रम योजला असल्यामुळे भालेकर यांचे आप्तेष्ट, विद्यार्थी, मित्रपरिवार, सुतार ज्ञाती समाज मंडळाचे पदाधिकारी, मोठ्या संखेने उपस्थित होते . काही सुहृद आणि विद्यार्थी गावाहुन कार्यक्रमासाठी आले होते. शेवटी रत्नाकर विटकर यांच्या चटपटीत आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महात्मा गांधीजी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या बद्दल समज गैरसमज

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी -अनिल ससाने**

गांधीजी आणि नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या बद्दल लोक नेहमीच हे एकमेकांच्या विरोधात होते असा गैरसमज पसरवतात .परंतु ते एकमेकांच्या किती जवळचे होते या बाबींचा आढावा घेतल्यास त्यांनी एकमेकांना सहाय्यच केले आहे याच बाबी स्पष्टपणे दिसून येतात .सुभाष बाबू त्या काळात आय .सी .एस झालेले, मोठ्या पगाराच्या सरकारी नोकरीच्या मागे न लागता स्वातंत्र्यासाठी काँग्रेसच्या चळवळीत सामील झाले .हिंसा -अहिंसा , सशस्त्र आणि नि:शस्त्र , साध्य _साधन अशा गोष्टी स्वातंत्र्यप्राप्तीच्या आड येऊ नये हा नेताजींचा विचार आणि गांधीजी अहिंसेच्या मार्गावर ठाम . हाच एकमेव काय तो दोघांच्या विचारांमधला भेद .समाजवादी आणि डाव्या विचारसरणीच्या प्रगतिशील विचारवंतांनी एकत्र येऊन देशाचे नेतृत्व करायला हवे हा विचार जेव्हा पुढे आला तेव्हा सुभाष बाबू गांधींना भेटले त्यावेळी सुभाष बाबूंनी काँग्रेसचे नेतृत्व करावे असा सल्ला गांधीजींनी त्यांना दिला .सुभाष बाबू सर्वप्रथम 1938 ला काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष झाले तेव्हा सरदार पटेल आणि पंडित नेहरू यांनी विरोध केला परंतु एक बुद्धिमान आणि अभ्यासू तरुण काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवडला गेल्यामुळे गांधीजी आनंदात होते .सशस्त्र क्रांतीचा लढा सुभाष बाबूंनी सुरू केल्यानंतर त्यांना अटक झाली आणि नजर कैदेत ठेवण्यात आले तेव्हा गांधीजी म्हणाले सुभाष चंद्र बोस यांनी आजपर्यंत खूप मोठा त्याग केलेला आहे काँग्रेसवर कमिटी करू शकणार नाही ते आपण करून दाखवू असे ते माझ्याशी बोलले होते .त्यांचे ध्येयधोरण योग्य असल्याची खात्री पटताच त्यांच्या झेंड्याखाली मी स्वतः जाऊन उभा राहील . त्यांच्या नेतृत्वाखाली मी स्वतः काम करीन .दिनांक ६ जुलै १९४४ रोजी सुभाष बाबूंनी प्रत्यक्ष गांधीजींना उद्देशून रेडिओवर केलेल्या भाषणात महात्मा गांधींना सर्वप्रथम राष्ट्रपिता संबोधले होते .त्या भाषणात सुभाष चंद्र बोस म्हणाले होते देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी सुरू केलेल्या या लढ्याला तुमचे आशीर्वाद आणि शुभेच्छा मागत आहे .आणि सुभाष बाबूंना सर्वप्रथम नेताजी संबोधणारे महात्मा गांधीजीच होते .सशस्त्र क्रांती आणि अहिंसा याबाबतीत नेताजी आणि गांधीजींमध्ये मतभेद असतीलही पण त्यांच्यातील मतभेद त्या दोघांच्याही परस्परांविषयी असलेल्या प्रेमाच्या कधीच आड आले नाहीत .काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी गांधीजी आजारी पडले तेव्हा ते सुभाष चंद्र बोस यांच्याच घरी मुक्कामी राहिले .आणि सुभाष चंद्र बोस यांनी त्यांची अत्यंत मनोभावे सेवा केली .आझाद हिंद सेनेच्या पलटणींची नावे ही सुभाष बाबूंनी ' गांधी ब्रिगेड' नेहरू ब्रिगेड असेच ठेवले होते जर त्यांच्यामध्ये टोकाचे मतभेद असते तर त्यांनी दूर देशात आपल्या या नेत्यांच्या नावाने कधीही सेनेचे उभारणी केली नसती .महात्मा गांधी आणि सुभाष चंद्र बोस हे एकमेकांविरोधात होते असं सांगणारे हे साफ पणे विसरले





आहेत जेव्हा आझाद हिंद सेनेने अंतिम शहरांना गती पत्करली तेव्हा नेताजींनी आपल्या या सैनिकांना भारतात गेल्यानंतर अहिंसेचे शिपाई बनून गांधीजींच्या आदेशानुसार काम करा असा निरोपाचा सल्ला दिला होता .हे सत्य जाणीवपूर्वक लपवण्यात येते .आझाद हिंद सेनेच्या पराभूत सैनिकांवर आणि अधिकाऱ्यांवर दिल्लीच्या लाल किल्ल्यात जेव्हा देशद्रोहाचा खटला दाखल केला तेव्हा पंडित नेहरू अनेक वर्षानंतर अंगावर काळा कोट चढवून त्यांच्या बाजूने वकील म्हणून उभे राहिले . त्यानंतरच्या काळात नेहरुंच्या सरकारने त्या सर्व सैनिक आणि अधिकाऱ्यांचे पुनर्वसनही केले .महात्मा गांधीजींचा 75 वा वाढदिवस ते स्थानबद्ध असताना आझाद हिंद सेनेने सिंगापुरात धुमधडाक्यात साजरा केला .तेथे केलेल्या भाषणा ते असं म्हणतात "सण १९२० मध्ये अहिंसक सत्याग्रहाचे नवे हत्यार घेऊन गांधीजी पुढे आले नसते तर आजही भारत गुडघे टेकून इंग्रजांची करूणाभाकत असताना दिसला असता भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील त्यांचे कार्य असाधारण आणि अभूतपूर्व म्हटले पाहिजे सन 1920 नंतर गांधीजींमुळे भारतीयांना राष्ट्रीय स्वाभिमान आणि आत्मविश्वास म्हणजे काय हे शिकता आले " . या ठिकाणी विचार करण्यासारखी गोष्ट आहे जर सुभाष बाबू आणि गांधीजी यांच्यात टोकाचे भेद असते तर सुभाष बाबूंनी सिंगापुरात गांधीजींचा जन्मदिवस साजरा करून आपल्या भाषणातून त्यांचा गौरव का केला असता ??? .सुभाष बाबू सारख्या योद्धयाने गांधींसारख्या योद्धयाला दिलेला तो सन्मान आहे .भारताचे प्रतिसरकार स्थापन केल्याबरोबर सुभाष चंद्र बोस यांनी स्वतंत्र भारताचे हे प्रतिसरकार गांधींना राष्ट्रपिता मानते अशी घोषणा केली यावरून काय लक्षात येते ? ?? दिनांक14 एप्रिल 1946 च्या हरिजन मधील लेखात गांधींनी लिहिले आहे सुभाष बाबू सच्चे देशभक्त होते अभिमान वाटावा अशा अनेक गोष्टी त्यांनी केल्या हिंदुस्तानातील सर्व जाती धर्मातील लोकांना त्यांनी एका झेंड्याखाली एकत्र आणले , त्यांच्यात देशभक्ती आणि एकात्मता जोपासली, संकुचित जातीय भावनेतून त्यांना मुक्त केले .जरी ते विदेशात शस्त्र घेऊन लढत असले तरी माय भूला परत आल्यावर काँग्रेसच्या मार्गदर्शनाखाली आणि नेतृत्वाखाली अहिंसेचे सैनिक म्हणून त्यांना या देशाची सेवा करायची होती .सुभाष बाबूंनी सशस्त्र पद्धत वापरल्यावर तिच्या मर्यादा त्यांच्या लक्षात आल्या होत्या . म्हणून अहिंसा, ऐक्य सुसंवाद आणि संघटन वाढीस लावणे हाच आझाद हिंद सेनेचा संदेश होता .सुभाष बाबू यांच्या सशस्त्र लढ्याला जरी गांधींचा विरोध होता तरी त्यांच्या असामान्य देशभक्तीची सहसाची गांधीजी मोकळ्या मनाने प्रशंसाच करत असत .यावरून सुभाष बाबू आणि गांधीजी यांच्यात वैचारिक मतभेदापलीकडे जाऊन किती जिव्हाळ्याचे संबंध होते हे लक्षात येते .मतभेद कुणामध्ये नसतात सख्ख्या भावा - भावांमध्ये , बाप - लेकामध्ये मतभेद असतात ते असणे स्वाभाविक आहे .पंडित नेहरू आणि सरदार पटेल यांच्याशी सुद्धा गांधीजींचे अनेक बाबतीत मतभेद होते परंतु ते एकमेकांचे शत्रू म्हणून कधीच वागले नाही त्या प्रत्येकाने प्रत्येकाचे मत त्या ठिकाणीच खोडून काढले आणि देश कार्यासाठी आपले अमूल्य योगदान दिले .

भारतीयांनी या महापुरुषांच्या कार्याचे मूल्यमापन करताना आपण स्वतः देशासाठी काय केले आहे याची एक यादी बनवावी आणि मगच या महापुरुषांच्या कार्याचे मूल्यमापन करावं.........

**क्रांती सिंधु मेरत...**
**(शिक्षिका)**
**जि.प. प्राथमिक शाळा**
**उंबरखेड केंद्र राजुर**
**जिल्हा जालना**